मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

मप्र

# हितगुज

अंक ७०❖संपादिका: डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०)❖ जून २००७ (फक्त खाजगी वितरणासाठी)

दूरध्वनी:२४१५०८८९ (वडाळा, मुंबई ४०००३१); ई-मेल: maratheparivar@yahoo.co.in


(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

## संपादकीय भूमिका

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा सप्रेम नमस्कार.

हा अंक आपल्या हातात पडेल तेंव्हा पावसाची रिमझिम चालू झाली असेल. वैशाख वणव्याने तप्त झालेली धरा शांत झाली असेल. 'अधिक ज्येष्ठ' या 'पुरुषोत्तम' मासअखेर हा अंक निघत आहे. तसेच अठराशे सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराला ह्यावर्षी १० मे २००७ रोजी १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या क्रांतियुद्धात फाशी गेलेल्या, हुतात्मा झालेल्या क्रांतिवीरांना अभिवादन करणे प्रत्येक देशभक्ताचे कर्तव्य ठरते. असो.

गेल्या मार्च २००७ च्या हितगुजमध्ये कुलभगिनींना 'माहेरच्या अंगणांत' या सदरासाठी लेख पाठविण्याचे आवाहन केले होते. परंतु निराशाच वाट्याला आली. अजूनही भगिनींनी मोकळेपणाने लिहून हितगुजसाठी आपले लिखाण पाठवावे. त्याचे स्वागतच केले जाईल.

प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या गेल्या बैठकीत अध्यक्ष आनंदराव यांनी त्यांचा भाचा सुनील जोशी हा अमेरिकेत जाऊन आला आणि त्याचा व्यवसाय तो कसा वाढवीत आहे याविषयी सांगितले. हे ऐकून मी प्रभावित झाले व ठरविले की पुढचा 'प्रकाशझोत' सुनील जोशींवरच. अध्यक्षांकडून जोशींचा मोबाईल, पत्ता घेऊन वेळ ठरविली. कार्यबाहुल्यामुळे सुनीलना वेळ देणे शक्य होत नव्हते. पण मी पाठपुरावा करीत राहिले. म्हटलं, मला एकच तास द्या. आणि योगायोगाने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्ताला दादर येथे त्यांच्या नवीन शो-रूमचे उद्घाटन होणार असल्याचे समजल्यानंतर

(पुढील मजकूर पृ.८वर)




## १८५७ चे स्वातंत्र्यसमर आणि स्वा.सावरकरांचे इतिहासलेखन

*समीक्षक- सी.गो.खांबेटे, अंधेरी. दूरध्वनी ०२२-२६८३६९९४*

इंग्रजी शिक्षणाद्वारे भारतीय देहात इंग्रजाळलेले मन ओतण्याच्या प्रयत्नात इंग्रजांना जरी बव्हंशी यश मिळाले, तरी भारताच्या सुदैवाने त्याच वाघिणीच्या (इंग्रजी) दुधातून चिपळूणकर-टिळकांचा स्वदेशनिष्ठ पक्षदेखील जन्माला आला. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा सन्मान व्हावा, असा या पक्षाचा निखळ हेतू होता. सावरकरांच्या बालमनावर हे संस्कार घडले व त्यांच्या विचारांची बैठक तयार झाली. कुमारावस्थेपासूनच ते इतिहासाचे डोळस विद्यार्थी होते. वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी त्यांनी 'सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण आणि त्याची कारणे' आणि 'ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव का करावेत ?' हे निबंध लिहून दोन निबंधस्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकाची बक्षिसे मिळवली होती. हे निबंध म्हणजे स्वा. सावरकरांच्या भावी काळातील एकंदर इतिहासलेखनाची गंगोत्रीच म्हणता येईल. या लेखात स्वा. सावरकरलिखित '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या इतिहासग्रंथाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

(पुढील मजकूर पृ. ४ वर)

**इकडे लक्ष असू द्या बरं!** (१) मराठे प्रतिष्ठानची २५वी **वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार दि.**२२ जुलै २००७** रोजी सायं.५ वा.**दामले योगवेंद्र सभागृह**, लोकमान्यनगर सभागृहाजवळ, मनमाला टँक रोड, **माटुंगारोड (प.रे.)** मुंबई १६ येथे.सूचना व अहवाल पृ.२२-२९. (२) **मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००८** साठी पृष्ठदान, जाहिराती, व अन्य मजकुरासाठी अंतिम तारीख **१५-८-२००७.** सविस्तर निवेदन पृ. १६ वर. (३) २००६-०७च्या **गुणवत्ता पारितोषिकासाठी** गुणपत्रिकांसह अर्ज पाठविण्याची **अंतिम तारीख १५-८-२००७.** सविस्तर निवेदन पृ. १८ वर **(४)जागतिक चित्पावन महासंमेलन- दि.२३-१२-२००७ पुणे** सविस्तर निवेदन पृ. ७ वर.

### हितगुजच्या हायटेक वाचकांसाठी खुष खबर!!!

हितगुज आता हायटेक झाला आहे. आपल्या पोस्टाने किंवा कूरियरने मिळणाऱ्या प्रतीला विलंब झाला,गहाळ झाली तरी वेबसाईटवर **मुखपत्र**वर क्लिक करा व वाचा हा अंक आणि यापूर्वीचेही दोन्ही अंक!


**मराठे प्रतिष्ठान** पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र.ई.७९१८ (मुं.ता.१२-१-१९८१) मराठे उद्योग भवन,आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी,मुंबई ४०००२५. **दूरध्वनी:२४३०२४५३.**

❖**संपादकीय सहाय्य व अक्षरजुळणी : सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) ;** ❖वेबसाईट : www.marathepratishthan.org



**पत्रव्यवहाराचा पत्ता:**(१)संपादिका:डॉ.सौ.सुमेधा प्र मराठे ८/१३, सहकार नगर,वडाळा-प. मुंबई ४०००३१**ईमेल**-prabhakar_marathe@yahoo.com

(२)सहायक संपादक: श्री.सीताराम गो. खांबेटे ए-१३, संपदा सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९

ईमेल (1)sitaram_khambete@yahoo.com (2)maratheparivar@yahoo.co.in दूरध्वनी:०२२-२६८३६९९४;

# मराठे प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापन दिन व दैनंदिनी २००७ चे प्रकाशन: क्षणचित्रे




१) नव्या संपादकत्वाखालील हितगुज ६८(डिसेंबर २००६) चे प्रकाशन करताना डावीकडून-सर्वश्री गिरीश जाखोटिया, सीताराम खांबेटे, अध्यक्ष आनंद मराठे, ल.शं.मराठे व अरुण मराठे

२) २००७ च्या दैनंदिनीचे प्रकाशन करताना डावीकडून-सर्वश्री गिरीश जाखोटिया, सीताराम खांबेटे, अध्यक्ष आनंद मराठे, ल.शं.मराठे व अरुण मराठे





३) सौ. नीलांबरी मराठे यांना गौरवपत्र देतांना अध्यक्ष आनंद मराठे. मागे सूत्रसंचालक माधव मराठे.

४) कार्यक्रमास उपस्थित मराठे परिवार सदस्य समुदाय.

५) चि. तन्मय अजित चक्रदेव याला गुणवत्ता पारितोषिक व प्रशस्तीपत्र देताना अध्यक्ष आनंद मराठे.






६) हितगुज चे पूर्व संपादक ल.शं. मराठे यांचा सत्कार करताना अध्यक्ष आनंद मराठे.

७) श्री. प्रमोद धुंडिराज यांचा सुपुत्र हार्मोनियम सोलो वादन करताना.

८) नव्या स्वरूपात हितगुजसंबंधी विचार व्यक्त करताना सह संपादक सीताराम खांबेटे. बाजूला सौ. नीलांबरी मराठे व माधव मराठे.

# प्रतिष्ठान वृत्त

## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करावा म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

मागील मार्च-मे २००७ या तिमाहीत दि. १० मार्च ०७, १४ एप्रिल ०७, १२ मे ०७ व २९मे ०७ रोजी कार्यकारी मंडळाच्या बैठका झाल्या.

**१.** दि.१०-०३-०७च्या बैठकीमध्ये ४ सभासद उपस्थित होते. मागील सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आले व पत्रव्यवहाराची नोंद घेण्यात आली.

**२.** दि.१४-०४-०७ ची बैठक श्री. रमाकांत विद्वांस (कार्योपाध्यक्ष) यांचे निवासस्थानी घेण्यात आली. या बैठकीला १० सदस्य उपस्थित होते. जागतिक चित्पावन संमेलन (पुणे) मध्ये मराठे प्रतिष्ठानचा सहभाग कसा असावा याबद्दल चर्चा झाली. संमेलनाचा तपशील मिळाल्यावर निर्णय घेण्याचे सर्वानुमते ठरले. अध्यक्षांनी यासंबंधी काही मार्गदर्शनपर भूमिका मांडली. आपला दरवर्षीचा पुणे दैनंदिनी प्रकाशन समारंभ २५ डिसेंबरलाच व्हावा असे सर्वांचे मत होते. हितगुजचे चांगले बदलते स्वरूप पाहून सर्वांनी समाधान व्यक्त केले.

**३.** दि.१२-०५-०७ च्या प्रतिष्ठानच्या मराठे उद्योग भवन कार्यालयात भरलेल्या बैठकीत अध्यक्षांसह ६ सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे यांच्या योजनेनुसार मराठे कुल संमेलन जागतिक चित्पावन महासंमेलनासमवेत घेण्याच्या प्रस्तावावर हा विचार अंमलात आणणे व्यावहारिक दृष्ट्या शक्य नसल्याचे एकमताने निश्चित करण्यात आले. त्यामुळे दैनंदिनी प्रकाशन नेहमीप्रमाणे २५ तारखेलाच घ्यावे असेही ठरविण्यात आले. संघाच्या पुणे बैठकीसाठी श्री. सी.गो. खांबेटे उपस्थित राहाणार असून त्याना हा निर्णय फोनवर कळविणार असल्याचे अध्यक्षानी जाहीर केले. प्रतिष्ठानचे ज्येष्ठ श्रेष्ठ सदस्य श्री.विनायक केशव मराठे म्हणजे आपले 'व्हीके' यांच्या वयाला ८० वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यानी पेढे वाटले. उपस्थित सदस्यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यासाठी सदिच्छा व्यक्त केली.

**४.** दि. २९-०५-०७ च्या कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या घरी भरलेल्या बैठकीत अध्यक्षांसह ९ सदस्य उपस्थित होते. प्रतिष्ठानचा २००६-०७ चा ताळेबंद व आयव्यय संमत झाला.

-०-

**मार्च ते मे २००७ या तिमाहीत प्रतिष्ठानला मिळालेल्या विविध रकमांचा तपशील.**

| पावती.क्र. | देणगीदार | हेतू | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| मुं. १६७६ | श्री.गोविंद(मधू) बाजीराव जोशी,(पृ.७४४)कॅनडा; | आश्रयदाता सदस्य शुल्क | १,००० |
| | | हितगुज तहहयात वर्गणी | ३,५०० |
| मुं. १६७७ | श्री.प्रभाकर दा. मराठे, (पृ.१२०) वडाळा | हितगुज जाहिरात(मार्च०७) | ६०० |
| मुं. १६७८ | श्री.शशिकांत परशुराम मराठे,(पृ.१५०)अंधेरी | कुलवृत्तांत निधी | १,००१ |
| मुं. १६७९ | श्री.हेमंत महादेव मराठे,(पृ.४७१) विलेपार्ले | आजीव सदस्य शुल्क | १०० |
| | | हितगुज तहहयात वर्गणी | २०० |
| | | हितगुज निधी | २०० |
| मु. १६८० | श्री.सुरेश भास्कर मराठे,(पृ.४२७) विलेपार्ले (मातोश्री कै.सिंधुबाई यांच्या स्मरणार्थ ) | कुलवृत्तांत निधी | २,००१ |
| मुं. १६८१ | श्री. संजय रघुनाथ मराठे, (पृ.४२७) पुणे | बारावी कॉमर्स व बी कॉम परिक्षेत परिवारातील सर्वाधिक गुणवंतांचे पारितोषिकासाठी योजना (कै. रघुनाथ कृष्ण मराठे स्मृती कॉमर्स पारितोषिके) | २१,००० |
| मुं .१६८२ | श्री.मोहन सदाशिव मराठे,(पृ.३६५)खार | हितगुज जाहिरात(जून ०७) | ६०० |

**सूचना**:*प्रतिष्ठान कार्यालयाकडे मनी ऑर्डर करताना संपूर्ण नांव व पत्ता देणे आवश्यक आहे..*

# सभासद वृत्त

## मान सन्मान

**ओंकार गोपाळ मराठे, कराड (पृ.५५३)**
**यूपीएससी परीक्षेत उत्तीर्ण**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) २००६ मधील परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. त्यात कराडचा ओंकार मराठे याने २१८ गुणांसह भरघोस यश मिळविले. ओंकार गेल्या वर्षीच या परीक्षेत उत्तीर्ण झाला असून इंप्रूव्हमेंटसाठी पुन्हा परीक्षेला बसला होता. मराठे प्रतिष्ठानतर्फे या उज्ज्वल यशाबद्दल चि.ओंकारचे हार्दिक अभिनंदन आणि पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**पुण्याचे उद्योजक व**
**गो.स.पारखे औद्योगिक पुरस्कार**
**२००७-०८ चे विजेते**



**विनीत सुभाष मराठे (पृ.४७४)**

भारतीय सेनेसाठी अत्यंत महत्त्वाची शस्त्रप्रणाली म्हणजे पुण्याच्या ए आर डी ई ने निर्माण केलेली मल्टी बॅरेल रॉकेट लॉंचिंग सिस्टिम या प्रणालीसाठी लागणारे ॲल्युमिनियम पॉड विकसित करण्याचे काम पुण्याचे विनीत सुभाष मराठे ह्यांनी केले. हे पॉड वजनाला हलके तरीही मजबूत व अचूक असून सर्व चाचण्यांमध्ये यशस्वी ठरले आहे विनीत ह्यांनी केलेले हे नावीन्यपूर्ण काम डी आर डी ओ ह्या लष्करी संस्थेने मान्य करून त्यांनी विकसित केलेली ही नवीन प्रणाली भारतीय सेना दलाने स्वीकारली आहे.

विनीत मराठे यांनी वेल्डिंग (मेटॅलर्जी-धातुविज्ञान) या विषयात एम ई ही पदवी घेतली आहे. त्यांना यापूर्वी (१) "ऑल इंडिया वेल्डिंग बेस्ट केस स्टडी ॲवॉर्ड ", (२) " पीसीएमसी आंत्रप्रिनेर ॲवॉर्ड २००६-०७ " , व (३) "ब्राह्मण महासभा अचीव्हमेंट ॲवॉर्ड " असे विविध पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांची "विनार्क इंजिनियर्स" ही स्वतःची कंपनी आहे. यात वेल्डिंगसाठी लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध आहेत. त्यांनी वेल्डिंग प्रशिक्षण आणि सल्ला देण्यासाठी मराठे वेल्डिंग सेल ही एक संस्था सुरू केली आहे.



श्री. विनीत मराठे,
पारखे पुरस्कार २००७-०८ स्वीकार करताना

***(पुढील मजकूर पृ. १८ वर)***

## (१८५७चे स्वातंत्र्यसमर आणि स्वा.सावरकरांचे इतिहासलेखन -पृ.१ वरून )

१४-१५ऑगष्ट१९४७ च्या मध्यरात्री अखंड भारताची दोन शकले होऊन पाकिस्तान या नावाने एक नवे 'पापस्तान' जन्माला आले आणि उरल्यासुरल्या छिन्न-विच्छिन्न खंडित भारताला एक कायमची डोकेदुखी सुरू झाली. 'हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वी माझ्या देहाची छकले करावी लागतील' अशी राणा भीमदेवी गर्जना करणाऱ्या भीष्मपितामहानी आद्यपंतप्रधानपदाची ओढ लागलेल्या ज्येष्ठश्रेष्ठ नेत्यांपुढे शरणागती पत्करली व मूक संमती देऊन लाखो निरपराध देशवासियांच्या रक्ताच्या नद्यांच्या तीरावर 'शांतिपाठ' म्हणत उभे राहून रक्तलांच्छित स्वातंत्र्याचे पारणे फेडले हा खरा इतिहास आहे. त्याकडे दुर्लक्ष करून 'ब्रिटिशांविरुद्धची चलेजाव मोहीम' व 'सत्याग्रहाच्या शांततामय आंदोलनाची फलश्रुती' म्हणून देश स्वतंत्र झाला असा भ्रामक अपसमज पसरविणाऱ्या देशातील सत्ताभोगी राष्ट्रीय पक्षाला सावरकरांच्या स्वातंत्र्यलढ्यासंदर्भातील कार्याचे महत्त्व ते काय वाटणार? पण भारताच्या स्वातंत्र्या बद्दल विचार करताना स्वा. सावरकर यांच्या प्रेरणादायी कार्याचा विसर सर्वसामान्य भारतीयाना तरी होता कामा नये. सावरकरांनी प्रत्यक्ष चळवळीत भाग घेऊन अभिनव भारत सारख्या संघटनांच्या माध्यमातून केलेले कार्य असो, जहाल लेखांद्वारे केलेली जनजागृती व त्या अनुषंगाने सोसलेले अंदमान-काळेपाणी सारखे कठोर कारावास असोत, अथवा आपल्या क्रांतिकारी दृष्टीने केलेले इतिहासाचे पुनर्लेखन असो यातील प्रत्येक बाब ही एकाद्या प्रबंधाचा स्वतंत्र विषय होऊ शकते. प्रस्तुत लेखात भारतीय स्वातंत्र्य व सावरकरांचे इतिहास लेखन या संबंधांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. आताच्या २००७ साली म्हणजे स्वातंत्र्याच्या हीरकमहोत्सवाच्या व त्याच वेळी सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने तरी सावरकरांचे सुयोग्य महत्त्वदर्शन नव्या पिढीला येते वर्षभर निरंतर होत राहावे यासाठीच्या ज्ञानयज्ञामध्ये ही एक समिधा.

### इतिहासाच्या पुनर्लेखनाची आवश्यकता

इंग्रजांनी भारतावरील त्यांचे अधिपत्य अबाधित राखण्यासाठी भारतीय इतिहासाच्या विकृतीकरणाची प्रक्रिया आरंभली होती. त्यावेळी भारतीय इतिहासाच्या रंगभूमीवर सावरकरांचा प्रवेशही झाला नव्हता. भारतीयांचा ठायीठायी तेजोभंग करून त्यांचा स्वदेशाभिमान नष्ट करावा व भारतीयांच्या देहात इंग्रजाळलेल्या मनांची स्थापना करावी, असा इंग्रजी राज्यकर्त्यांचा कुटील हेतू होता. तो बव्हंशी सफल होऊन 'यद्यद् भारतीयं तत्तद् गर्हणीयं, यद्यद् युरोपीयं तत्तद् स्पृहणीयम्।' अशा प्रवृत्तीचा प्रचार बुद्धीपुरस्सर केला गेला. इंग्रज लेखकांनी हेतुतः विकृतपणे लिहिलेल्या भारतीय इतिहासाच्या पारायणांमधून इंग्रजांच्या भारतीय मानसपुत्रांची वीण वाढली. या इतिहासाने भारतबाह्य जगाचाच नव्हे, तर भारतीय लोकांचाही पद्धतशीरपणाने बुद्धीभ्रंश केला. अशा इतिहासवाचनाने '*हिंदुस्थान हे निरंतर कोणत्या ना कोणत्या विदेशी सत्तेच्या दास्यातच खितपत पडलेले राष्ट्र असून हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे हिंदूंच्या पराभवांमागून पराभवांचीच ती एक मालिका आहे*' असा अपसमज बळावला. स्वातंत्र्य, स्वदेश व स्वराष्ट्र या कल्पनाच आमच्या पूर्वजांना माहीत नव्हत्या, अशा प्रकारचे विचार इंग्रजांच्या भारतीय मानसपुत्रांनी प्रचारात आणले. या विकृत इतिहासाच्या त्या भ्रांत धारणांच्या मगरमिठीतून आजही स्वतंत्र भारताची नवी पिढी मुक्त झालेली नाही. कारण नव्या पिढीला खरा



इतिहास कळूच नये या हेतूने गेल्या पन्नास वर्षांत भारतीय शासनकर्त्यांनी सुद्धा इंग्रजलिखित विकृत इतिहासाचेच शिक्षण यथावत् चालू ठेवले आहे. अल्पसंख्यांकांच्या तुष्टीकरणाच्या हव्यासापायी व सर्वधर्मसमभावाच्या गोंडस नावाखाली आक्रमक मुघल सम्राटांच्या हिंदुविरोधी कारवायांचे त्वेषाने प्रतिकार करणाऱ्या हिंदूंच्या पराक्रमी आवेशाचे सौम्यीकरण अट्टाहासाने केले जात आहे. नव्या पिढीला खरा इतिहास अवगत होण्यासाठी शालेय पुस्तकांत प्रचारिलेला सरकारी मिळमिळीत इतिहास फेकून देऊन 'स्वतंत्र भारताच्या खऱ्या इतिहासा' चे पुनर्लेखन प्राधान्याने अंगीकरणे आवश्यक झाले आहे. हे करतांना प्राचीन भारतापासून चालत आलेल्या भारतीय म्हणजेच 'हिंदवी' संस्कृतीची यत्किंचितही उपेक्षा होऊ देता नये. अशा प्रकारच्या इतिहास लेखनासाठी स्वा. सावरकरांच्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाची धावती ओळख करून घेणे आवश्यक ठरते.

### '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या इतिहास ग्रंथाचा इतिहास

'शिपायांचे बंड' म्हणून १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याविषयी भारतात विलक्षण भ्रामक व दुष्ट अपसमज १८५७ पासून पुनःपुन्हा ब्रिटिशांनी व त्यांच्या 'मेकॉले' छाप मानसपुत्रांनी आणि पुढे स्वतंत्र भारतातील ब्रिटिशांच्याच वैचारिक दासांनी प्रचारात आणला. हे करंटे दुर्दैव असले, तरी स्वा. सावरकरांनी मात्र १९०७ साली उच्चशिक्षणाच्या निमित्ताने लंडनमधील वास्तव्यकाळात '१८५७च्या क्रांतीयुद्धाचा अर्ध-शताब्दी उत्सव' इंग्लंडच्याच राजधानीत गाजवला होता, हे कसे विसरता येईल? ब्रिटिश ग्रंथागारातील विपुल सामग्रीचे अध्ययन करून भरपूर प्रलेखनीय पुरावे व इंग्रज ग्रंथकारांचीच अवतरणे प्रस्तुत करून ते 'स्वातंत्र्ययुद्ध' च होते, असे सिद्ध करणाऱ्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाची निर्मिती स्वा. सावरकरांनी वयाच्या अवघ्या २५व्या वर्षी केली. पुन्हा एकदा सैनिकी क्रांती घडवावी, भारतीय स्वातंत्र्यासाठी क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचे शास्त्रशुद्ध मार्गदर्शन करावे आणि सफळ स्वातंत्र्यसंग्राम घडवून आणावा, या हेतूनेच सावरकरांनी हा ग्रंथ रचला. पण आश्चर्य आणि खेदाची गोष्ट अशी की हा वस्तुस्थिती कथन करणारा इतिहास असूनही, इतिहासतज्ज्ञांनी आणि १८५७ संदर्भातील अन्य ग्रंथकारांनी या ग्रंथातील निष्कर्षांचे खंडण करणे शक्य नसल्यामुळे सावरकरांचा उल्लेखही न करण्याची व या ग्रंथाची उपेक्षा करण्याची निंदनीय चलाखी अवलंबिली. अद्यापही काही भारतीय लेखक १८५७ च्या स्वातंत्र्यसमराकडे भारतीय दृष्टीकोनातून न पाहता इंग्रजी दृष्टीकोनातूनच पहात असतात. सावरकरांनी इंग्रजांच्याच लिखित सामग्रीकडे स्वतंत्रबुद्धीने पाहिले. सावरकर स्वतः क्रांतिकारकांच्या चळवळीतील अग्रणी असल्यामुळे इंग्रज लेखकांनी लिहिलेल्या घटनांचा अन्वयार्थ क्रांतिकारकांच्या दृष्टीकोनांतून लावणे त्यांना सहज शक्य झाले. साऱ्या जगात एकाच वेळी दोन (ब्रिटिश व अमेरिकन) सरकारांकडून हस्तलिखित अवस्थेतच जप्त होण्याचे दुर्भाग्य या ग्रंथाला लाभले. तरीही या मूळ मराठी ग्रंथाची भाषांतरे अनेकवार गुप्तपणे प्रकाशित झाली. गदर चळवळीचे पुढारी लाला हरदयाळ यांनी पहिल्या महायुद्धकाळी अमेरिकेत, सरदार भगतसिंह यांनी पुढे १९२७ साली आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात १९४२ च्या आसपास हे प्रकाशनकार्य तडीस नेले होते. यावरूनच या ग्रंथाची थोरवी समजून येईल. इतिहास घडवणाऱ्या या इतिहास ग्रंथाचाही एक इतिहास झाला आहे. याचे मूळ मराठी

हस्तलिखित इंग्लंड-अमेरिकेत उणीपुरी चाळीस वर्षे अज्ञातवासात राहून भारतीय स्वातंत्र्याच्या पाठोपाठ भारतात आले. त्यानंतर तब्बल १८ वर्षांनी १९६५ मध्ये हा ग्रंथ मूळ स्वरूपात प्रथमतः प्रकाशित झाला.

### क्रांतीच्या इतिहासाचे लिखाण

क्रांतीच्या मूलतत्त्वापर्यंत शोध घेऊन नंतर त्या तत्त्वाच्या दुर्बिणीतून क्रांतीच्या विस्तीर्ण प्रदेशाचे निरीक्षण केले म्हणजे अनेक असंगत प्रसंगांत पूर्ण सुसंगती दिसू लागते. दोन ओळींमधील (बिट्वीन दि लाईन्स) अदृश्य अक्षरे वाचण्याची क्षमता सावरकरांना लाभली होती. त्यांनी इंग्रजांच्या ग्रंथांतून, १८५७ च्या इंग्रज सेनाधिकाऱ्यांच्या पत्रांतून, नानासाहेबांच्या खलित्यांतून, अयोध्येच्या बेगमेच्या आणि बहादूरशहाच्या घोषणापत्रांतून, क्रांतीच्या आकस्मिक व प्रधान कारणांचे कुशल वर्गीकरण केले आहे. इंग्रजांनी काडतुसांच्या कारणाचा इतका प्रचंड गाजावाजा केला की, आजही भारतात बरीच मंडळी गाईची व डुकराची चरबी लावलेल्या काडतुसांच्या प्रकरणालाच १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे प्रमुख कारण मानतात. सत्य,निष्पक्ष आणि मार्मिक इतिहासलेखक 'सीताहरणास रावणवधाचे प्रमुख कारण मानेल काय?', हा सावरकरांचा प्रश्न आहे. पेशावरपासून कलकत्त्यापर्यंत हजारो वीरांच्या तलवारी रणांगणांत चमकवणारी अशी ही क्रांतीची प्रेरक तत्त्वे कोणती होती? मौलवींनी ज्यांना उपदेश करून दिल्लीच्या मशिदीतून आणि ब्राह्मणांनी ज्यांना 'विजयी भव' म्हणून आशीर्वादाने काशीच्या देवळांतून यशः प्राप्तीसाठी परमेश्वराकडे दिव्य प्रार्थना धाडाव्या, अशी ही क्रांतीची मूलतत्त्वे कोणती होती? असे अनेक प्रश्न प्रस्तुत करून सावरकर त्यांच्या ओजस्वी भाषाशैलीत उत्तरतात, *"१८५७ च्या क्रांतीमागील प्रधान कारणे वा मूलतत्त्वे म्हणजे स्वधर्म व स्वराज्य हीच आहेत! आपल्या प्राणप्रिय धर्मावर भयंकर व विघातक हल्ला झालेला आहे, हे पाहून स्वधर्मरक्षणार्थ जी 'दीनदीन' ही गर्जना चहूंकडे उठली त्या गर्जनेत व आपल्या निसर्गदत्त स्वातंत्र्याला कपटाने हिरावून आपल्या पायांत राजकीय गुलामगिरीच्या शृंखला घातल्या गेल्या, हे पहाताच स्वराज्य संपादनाच्या पवित्र इच्छेने त्या दास्य शृंखलेवर केलेल्या प्रचंड आघातांत या क्रांतियुद्धाचे मूळ आहे."*

### लुप्त इतिहासाचे शब्दचित्रण करणारे सावरकर!

काव्यात्म प्रतिभेच्या बळावर या युद्धांतील विविध पराक्रमपूर्ण प्रसंगांशी तन्मय होऊन सावरकर प्रत्येक घटना सजीव स्वरूपांत डोळ्यांसमोर उभी करतात. क्रांतीच्या नेत्यांची व्यक्तिचित्रे तर सावरकरांनी रंगवली आहेतच; परंतु फाशीची शिक्षा ऐकून प्रशांत स्थिरतेने न्यायाधिशाकडे पाठ फिरवून फासावर जाणारा कानपूरचा मॅजिस्ट्रेट, पाटण्याचा पुस्तक विक्रेता पीरअली, इंग्रजांच्या इमारतींना एका विशेष शोधाद्वारे आग लावणारा एकाक्ष करीमअली, जखमी शिपायांना मिठाई वाटत फिरणारी व विजेसारखी तळपणारी शस्त्रधारिणी अश्वारूढा नर्तकी अजीजन, कानपूरच्या क्रांतीकारकांच्या बैठकी ज्यांच्या घरी भरत तो त्या अजीजनचा प्रियकर शमसुद्दीन, मौलवी अहमजशाह जखमी होऊन रणभूमीवरून दूर गेल्याचे समजताच शेष सैन्याचे नेतृत्व करणारा व मरेपर्यंत रण झुंजवणारा विदेही हनुमान, रुइआ किल्ल्याचा करारी किल्लेदार नरपतसिंह आदि अनेक अज्ञात क्रांतिकारकांची जिवंत शब्दचित्रे इंग्रजांच्या ग्रंथांच्या आधारे सावरकरांनी अमर केली आहेत.

### वस्तुनिष्ठ इतिहास व अपेक्षा

सावरकरांच्या एकंदर इतिहास वाङ्मयात प्रतिभा, पांडित्य व पौरुषाचा आविष्कार प्रत्ययास येतो. कित्येक प्रसंगी प्रतिभेच्या स्पर्शाने सावरकर रसनिष्ठ ललित भाषेत वर्णन करतात. "इतिहास हा वस्तुनिष्ठच असावा; इतिहासलेखकाने निष्पक्षबुद्धीने यथावत् इतिहास लिहिणे, हेच त्याचे कर्तव्य. त्याने स्वतःची रुची किंवा अरुची बाजूला ठेवून आणि वर्तमानातील उद्दिष्टांवर व परिस्थितीवर होणाऱ्या संभाव्य परिणामांच्या भयाने किंवा शंकेने ग्रस्त न होता त्या मुख्य कर्तव्याचे उत्तम व यथातथ्य पालन केले पाहिजे" हा विचार सावरकरांनी त्यांच्या **हिंदुपदपातशाही** व **सहा सोनेरी पाने** या अन्य दोन्ही इतिहासग्रंथांतून सुद्धा पुनः पुन्हा मांडला आहे. इंग्रजांच्या चाकोरीच्या बाहेर पडून सावरकरांनी भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनाची दिशा भारतीय इतिहासकारांना दाखवली आहे. आगामी काळात भारताच्या खराखुऱ्या व गौरवशाली इतिहासाचे समीक्षण करण्याची जबाबदारी भारतीय इतिहासकारांनी उचलावी व इतिहासप्रेमींनी निष्पक्ष इतिहास संशोधनाला सुरुवात करावी, हीच अपेक्षा!



समीक्षकः सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६),
अंधेरी-पू. मुंबई ४०००६९ दूरध्वनीः २६८३६९९४

**ताजा कलम**: स्वा.सावरकरांनी १९०७ साली प्रथम लिहिलेल्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाचे सुद्धा शताब्दिवर्ष या निमित्ताने सावरकरांच्या या व अन्य ग्रंथांचा अभ्यास नव्याने करण्याची प्रेरणा या लेखाद्वारे युवापिढीला झाल्यास लेखकाला धन्यता वाटेल. आपल्या प्रतिसादाची अपेक्षा आहे.

*( या मूळ लेखाचा संपादित भाग वरील चित्रासह दैनिक सनातन प्रभातच्या ५ मे २००७ च्या अंकात "१८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव" या शीर्षकाखालील लेखमालेत प्रसिद्ध झाला आहे-संपादिका)*

## आगामी अंकात काय वाचाल?

आगामी अंकांसाठी आमचे कडे आलेल्या खालील साहित्याला यथावकाश प्रसिद्धी दिली जाईल.

१. धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे (स्थलवर्णन)
-सी. गो.खांबेटे, अंधेरी
२. राजस्थान सायकल रॅली
-विंग कमांडर(नि) यशवंत ल मराठे,पुणे
३. विवाह संस्काराचे महत्त्व (वैचारिक लेख)
-डॉ.सौ. हंसश्री सतीश मराठे, नागपूर
४. राजस्थानातील अनोखे अलवर (स्थलवर्णन)
-जयंत र. मराठे, पुणे
५. स्वा.सावरकरांचे कथाविश्व (पुस्तक परीक्षण)
-सी. गो.खांबेटे, अंधेरी
६. "युद्ध आमुचे सुरू" -श्री. विक्रम सावरकर यांचे चरित्र. (पुस्तक परीक्षण)
-डॉ.सुमेधा प्र. मराठे.
७. बेस्ट मधील श्री ना(पेंडसे)
-गजानन भास्कर मराठे, घाटकोपर
८. ज्योतिषः एक छंद व अभ्यास
-सौ. रोहिणी विजय मराठे, पुणे
९. मानवतेचा महापूर
-सौ. नीलिमा विष्णू विद्वांस, माणगांव
१०-Grandma's Maiden Flight
-G B Marathe,Ghtkpr
११-BEST bits
-G B Marathe,Ghtkpr

### युवापिढीसाठी आवाहन.

मराठी कॉंप्युटर टायपिंगसाठी युनिकोड /गमभन तंत्राची माहिती मिळवण्यासाठी खालील साइट पहा.
http://www.var-x.com/gamabhana/
तसेच आपणाला इंटरनेटवर सर्फिंग करताना अचानक एखाद्या उपयोगी साईटचा शोध लागतो. आपण आम्हाला कळविल्यास एखादी **वेबसाईट्सची सूची** आपल्या अन्य सदस्यांसाठी देता येईल यासाठी maratheparivar.co.in वर आपण कळवावे. - सी गो. खांबेटे, सह संपादक-हितगुज.

# आणखी एक- 'नारायण'

ले. गजानन भास्कर मराठे (पृ.४२७)
घाटकोपर पू. मुंबई ४०००७५ ;दूरध्वनी - २५१६३१०७

पु. ल देशपांड्यांचा 'नारायण' हा आपल्या सर्वांच्या परिचयाचा आहे. विवाह सोहळ्यामधील सर्व प्रसंगी-वरसंशोधन, साड्याखरेदी, दागदागिने, जेवणावळी ते वधूची सासरी पाठवणीपर्यंत प्रत्येक गोष्टीत त्याचा मोठा सहभाग असतो व तो सुद्धा निस्वार्थीपणे.

असाच एक 'नारायण' आमच्या ऑफिसमध्ये होता. मॅनेजरपासून शिपायार्यंत सर्वांची खाजगी कामे तो कुशलपणे व आवडीने करत असे. परत हे सर्व निस्वार्थीपणाने व आपले ऑफिसचे काम संभाळून.

या 'नारायण' च्या सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ प्रसंगी सर्व अधिकारी, कर्मचारी, शिपाई आदि सर्व हजर होते व त्याच्यावर भेटींचा मारा होत होता. कारण नोकरीच्या काळात नारायणकडून काही ना काही मदत झाली नाही असा एकही कर्मचारी,अधिकारी नव्हता. नारायण सर्वांचा आधार होता.

नारायण साधा शिपाई म्हणून नोकरीला लागला. त्याने व वायरमचा कोर्स पूर्ण करून विद्युत विभागात मीटर टेस्टर म्णून बढती मिळवली. नंतर तो मॅट्रिकची परीक्षा देऊन बस इन्स्पेक्टर म्हणून वाहतूक खात्यात आला. तिथे बढती मिळवून तो ॲक्सिडेंट इन्स्पेक्टर झाला. त्याला गंमतीने सर्व 'ठोकर मास्तर' म्हणत. या काळात त्याचा पोलिस, आदि खात्यांशी संबंध आला. विद्युत विभाग व वाहतुक विभाग या दोन्हीमधील अनुभवाच्या जोरावर तो लोकांच्या उपयोगी पडत असे. नंतर आर टी ओ, म्युनिसिपालिटी, मंत्रालय, हॉस्पिटल्स, पोलिस कार्यालय आदि ठिकाणच्या ऑफिसच्या अधिकृत कामाकरिता त्याला संपर्क अधिकारी म्हणून बढती देण्यात आली. यासर्व ठिकाणी त्याने मित्र जोडले होते व तिथे त्याचा घरच्या सारखा वावर होता.

रेल्वे-एसटीची तिकिटे काढणे, टेलिफोनची बिले भरणे, रेशन कार्डावर नाव वाढविणे वा कमी करणे, इन्शुरन्सचे पैसे भरणे अशी सर्वांची कामे तो पटापट करीत असे. कोणाही एखाद्याचे निधन झाले तर डेथ सर्टिफिकेट मिळवून देणे या गोष्टीकरिता सुद्धा पुढाकार घेत असे.

" नारायण, माझ्या मुलीची पत्रिका जुळली आहे. मुलगा बँकेत अधिकारी आहे. पण त्याच्यासंबंधी इतर फारशी माहिती मिळाली नाही." - मॅनजर.

त्या कॉलनींतील रहिवाश्यांची बस स्टॉपची मागणी होती. त्या संबंधात भेटीस आलो असे सांगून नारायणने प्रवेश मिळवला व चार पांच घरांत जाऊन अचूक माहिती काढली.

" साहेब, मुलगा व्यसनी आहे. अधूनमधून दारू पिऊन येतो. रेसचा पण नाद आहे. रात्री वॉचमनला त्याचा हात धरुन घरी पोहोचवावे लागते."-नारायण.

एक मुलगा घरापासून ऑफिसपर्यंत जाता येता माझ्या मागे लागतो व अचकट, विचकट बोलतो." -ऑफिसमधल्या एका मुलीची तक्रार.

नारायणने पोलिसमधील ओळखीने शहानिशा करून त्याला पोलिस इन्स्पेक्टरकडून असा दम दिला तो परत त्या मुलीच्या वाटेला गेला नाही.

"नारायण, पंधरा दिवसात पासपोर्ट पाहिजे आहे. मला वर्ल्ड बँकेच्या सभेला वॉशिंग्टनला जावे लागणार आहे. कारण माझे वरिष्ट जे जाणार होते, त्यांना अर्धांगाचा झटका आला आहे."- एक अधिकारी.

नारायणने माहिती काढली की पासपोर्ट अधिकाऱ्याच्या भावाची केस ॲक्सिडेंट ट्रायब्यूनलमध्ये आहे. त्याला बसचा धक्का लागला होता. त्याचा संदर्भ देऊन तो पासपोर्ट ऑफिसरला भेटला व आठ दिवसात पासपोर्ट घेऊन आला.

"नारायण, माझ्या जातीचा दाखला जात पडताळणी ऑफिसमध्ये पडून आहे. त्यामुळे माझी आरक्षित जागेवर कायम नेमणूक होत नाही."- एका शिपायाची कैफियत.

नारायणने माहिती काढली की पूर्वीचे आय ए एस मॅनेजर आता संबंधित खात्यात सचिव आहेत. नारायण त्याना भेटला व पंधरा दिवसात जातीच्या दाखल्याचे सर्टिफिकेट औरंगाबाग ऑफिसमधून मिळविले.

"नारायण, माझ्या बायकोला डायलेसिस करता दर आठवड्याला केइएम ला जावं लागतं. एखाद्या डॉक्टरची ओळख काढ. म्हणजे काम तत्परतेने होईल."-एक कर्मचारी.

"साहेब, नायर हॉस्पिटलमधून केईएम पर्यंत डॉक्टर लोकांकरिता आपण दोन बसेस दिल्या आहेत. त्यातील काही शिकाऊ डॉक्टरांची व माझी ओळख आहे. त्यावेळी ते शिकाऊ होते आज ते एचओडी आहेत. त्यांच्या करवी तुमचे काम करतो."-नारायण.

"नारायण, कॉलेजमध्ये माझ्या मुलीला ॲडमिशन पाहिजे."- एक कर्मचारी.

"साहेब, मी प्रयत्न करतो. सध्याचे प्रिन्सिपॉल आपल्या ऑफिसमध्ये नाईटशिफ्ट करून कॉलेज शिक्षण घेत होते व ते पीएचडी झाले, त्याना भेटून बघतो."-नारायण.

"नारायण, अलाहाबादला त्रिवेणी संगमावर माझ्या आजोबांचे रक्षा विसर्जन करावयाचे आहे. तिकडे पंडे लोक खूप त्रास देतात म्हणे!"- एक अधिकारी.

"साहेब, काळजी नको. आपला युनियन पुढारी बस ड्रायव्हर भजनसिंगचा भाऊ बनारसला भटजी आहे. त्याची बनारसला व अलाहाबादला घरे आहेत. तो रास्त पैशात आपले धार्मिक विधी करून देईल, शिवाय राहण्याची व जेवण्याची उत्तम सोय होईल.- नारायण.

"नारायण, बायका मुलांना गांवी पाठवायवे आहे. रेल्वे रिझर्वेशन मिळत नाही. गाड्याना मे महिना असल्यामुळे तुफान गर्दी आहे." -एक कर्मचारी.

"तुम्ही मुळीच काळजी करू नका. आपल्या एका कर्मचाऱ्याचा भाऊ बोरीबंदरला हमालांचा मुकादम आहे. तो हमालाकरवी जागा अडवून मिळवून देईल." -नारायण.

"नारायण, हापूस आंबे पाहिजेत. अमेरिकेत मुलाकडे घेऊन जायचे आहेत. माल अस्सल देवगडचा पाहिजे."- एक अधिकारी.

"साहेब, उत्तम माल आणतो. आपल्या एका कंडक्टरच्या भावाचे क्रॉफर्ड मार्केटमध्ये गेली ५० वर्षे आंबाविक्रीचे दुकान आहे. तो आंबे परदेशी पण पाठवितो. त्याचे आंबे बकिंगहॅम पॅलेसमध्ये जातात." -नारायण.

नारायणने उत्कृष्ठ आंब्यांची करंडी रास्त भावात आणून दिली.

नारायण नेहमी हसतमुख, बोलण्यात अत्यंत नम्र, आदबशीर, गणवेषसुद्धा अगदी स्वच्छ, बटणे व बिल्ला चकचकीत पॉलिश केलेला असा असायचा. बरं ह्या सर्व गोष्टी तो ऑफिसची नेहमीची कामे संभाळून करायचा. सकाळी सातला तो घर सोडत असे व रात्री ९ला घरी परतत असे. त्याची बायको पण हसतमुख असे. त्याने कधी कोणाला लाच दिली नाही. किंवा घेतलीही नाही. नारायणला लोकांना मदत करायचे "व्यसन" च होते.

नारायण आता सेवावृत्तीनंतर गावी जाऊन शेतीकडे बघणार आहे, त्याची अनुपस्थिती सर्व ऑफिसमध्ये सर्व ऑफिसला जाणवणार आहे. नारायणला "पर्याय" नाहीच.

*(आपले 'ग.भा.' बेस्ट मध्ये एक लोकप्रिय व समर्थ संपर्काधिकारी होते त्यानी अनुभवलेला हा नारायण प्रातिनिधिक आहे. मराठे परिवारातही असे अनेक नारायण दडले असतीलच. किंबहुना असे नारायण स्वयंस्फूर्तीने निर्माण व्हावेत व पुढे यावेत या हेतूनेच "मराठे हेल्प लाईन" व "मराठे कट्टा" या दोन संकल्पनांचा प्रस्ताव मागील अंकात केला आहे. आपल्या माहितीसाठी त्यांचा पुनरुच्चार याच अंकात अन्यत्र केला आहे. आपली प्रतिक्रिया अवश्य पाठवा. -सह संपादक)* -०-

<u>प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनो!</u>

आपले अर्ज शक्य असल्यास ई-मेल ने पाठवा. सोबत फोटो व गुणपत्रिका पाठवायला विसरू नका. शेवटची तारीख १५-८-०७.

# या अंकांत


१. संपादकीय भूमिका १
२. **१८५७चे स्वातंत्र्यसमर आणि स्वा. सावरकरांचे इतिहासलेखन** (समीक्षा) १
३. मराठे प्रतिष्ठानचा २७ वा वर्धापन दिन व दैनंदिनी २००७ चे प्रकाशन: क्षणचित्रे २
४. प्रतिष्ठान वृत्त ३
५. सभासद वृत्त ३
६. आगामी अंकात काय पहाल ? ५
७. आणखी एक नारायण ६
८. या अंकात (अनुक्रमणिका ) ७
९. चित्पावन महासम्मेलन २३-१२-०७ (आवाहन) ७
१०. आमचे याहू ! (व्यक्तिचित्रण) ८
११. प्रकाशझोत (२): गिर्यारोहक सुनील जोशी ९

**English Section**

१२. Awesome! B_O_M_B_A_Y १०
१३. Olny srmat poelpe can १०
१४. 3 Sardarjis in Singapore १०
१५. Cricket jokes ११
१६. “Seven Donts”after meal ११
१७. माझी अविस्मरणीय युरोप सहल (प्रवासवर्णन) १२
१८. व्यक्तीचे श्रेष्ठत्व १२
१९. महत्त्वाची सूचना (१) व (२) १२
२०. सीतेचे पूर्ववृत्त (पौराणिक कथा) १३
२१. जीवन (कविता) १३
२२. वळण (लघुकथा ) १४/१५
२३. मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००८ (सूचना) १६
२४. सदस्य-संवाद १७
२५. गुणवत्ता पारितोषिके २००७ (सूचना) १८
२६. हे चिते ! (आर्त गद्यकाव्य) १९
२७. छापता छापता ! अभिनंदन !! (१) मानसी २०
२८. छापता छापता ! अभिनंदन !! (२) नंदन २०
२९. पारितोषिकप्राप्त हस्ताक्षर स्पर्धा प्रवेशिका २१
३०. म.प्र. पंचविसावा वार्षिक अहवाल (मुखपृष्ठ ) २२
३१. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना २२
३२. म.प्र. पंचविसावा वार्षिक अहवाल २३-२४
३३. ३१ मार्च २००७ चा ताळेबंद २५
३४. २००६-०७ चे आयव्यय पत्रक २६
३५. परिशिष्ट-२ प्राप्त रकमांची सूची २७
३६. श्रवण बेळगोळा, वेलूर-हळेबिळू.(प्रवासवर्णन) २८
३७. प्रतिष्ठान आवाहन- १. हितगुज हेल्पलाईन २९
३८. प्रतिष्ठान आवाहन- २. मराठे परिवार कट्टा २९
३९. सभासदत्वासाठी अर्जाचा नमुना ३०
४०. फिटे समाजाचे ऋण (व्यक्तिपरिचय) ३१
४१. यशस्वी भव !-कु. मानसी नातू (कौतुकपर) ३१


-०-

**अक्षरगणेश-१: मंदार**





## जागतिक चित्पावन महासंमेलनः

**रविवार दि. २३ डिसेंबर २००७**

महाराष्ट्र चित्पावन संघ, पुणे यांच्या वतीने प्रथमच जागतिक चित्पावन महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. एक लाख चित्पावनांच्या सहभागाचे उद्दिष्ट ठेवलेल्या या महासंमेलनात प्रत्येक चित्पावनाने अवश्य सहभागी व्हावे व हे महासंमेलन यशस्वी करण्यास हातभार लावावा असे मराठे प्रतिष्ठान आपल्या परिवार सदस्यांना आवाहन करीत आहे.

रविवार दिनांक २३ डिसेंबर २००७ रोजी चंद्रशेखर आगाशे कॉलेज, मुकुंदनगर, पुणे येथे हे संमेलन भरणार असून कार्यक्रमाची रूपरेषा खालील प्रमाणे आहे.

या कार्यक्रम पत्रिकेत उल्लेखिलेल्या ‘आडनांवानुसार कुलसंमेलनाच्या’ बाबतीत मराठे प्रतिष्ठानने घेतलेल्या भूमिकेनुसार आपले मराठे परिवारसदस्य वेगळे कुलसंमेलन न घेता व्यक्तिशः महासंमेलनामध्ये दाखल होतील. त्यामुळे त्याना महासंमेलनाच्या प्रथम सत्रामधील विविध कार्यशाळांमध्ये मनसोक्त सहभागी होता येईल. या सहभागासाठीचे शुल्क प्रत्येक व्यक्तीसाठी रु. २०० प्रमाणे भरून आपली नांवे आगावू नोंदविणे आवश्यक आहे.(खालील वेबसाईटवर अद्ययावत सूचना/माहिती वेळोवेळी दिली जाईल. सपंर्क करण्यापूर्वी या साईटला अवश्य भेट द्यावी.)


संपर्क:

महाराष्ट चित्पावन संघ,१२०८,सदाशिव पेठ,टिळकरोड,लिमयेवाडी जवळ,पुणे ४११०३०

फोन:(०२०)३२५४१२४०/९३२३६९३२६६.फॅक्स:(०२०)२४४७५८३६

**e-mail:info@chitpavans.in website:www.chitpavans.in**

मोबाईल:(१)श्री अशोक वझे ९८८१७२४३७३ (२)श्री केशव गानू ९८८१७२४३७३ (३)श्री. मेघश्याम फडके ९८८१७२४३७५;

*मराठे परिवाराचे पुणे निवासी तसेच अन्य ठिकाणचे सदस्यानी*

*अधिक तपशीलासाठी व माहितीपत्रकासाठी व आपापले शुल्क भरून नांव नोंदविण्यासाठी*

*सौ.नीलांबरी मराठे, संचालिका- व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र ,*

*६४३, आप्पा बळवंत चौक, प्राथमिक नू.म.वि. शाळेसमोर, पुणे ४११०३०*

*किंवा फोन: २४४५६२७० येथे संपर्क साधावा.*


### कार्यक्रम

**सत्र पहिले**

सकाळी ८-३० ते दुपारी २.०० पर्यंत

★ **आपल्या आडनांवानुसार वेगवेगळ्या हॉलमध्ये प्रत्येक आडनांवाचे कुलसंमेलन होईल.**

★ तरुणांसाठी पुढील कार्य शाळांचे आयोजन संमेलनात करण्यात आले आहे. विषय व मार्गदर्शक पुढीलप्रमाणे आहेत.

★ **माहिती व तंत्रज्ञान (आय.टी)**
-दीपक घैसास / हर्ष बर्वे

★ **कला, मॉडेलिंग, प्रसार माध्यमातील संधी**
-विनय आपटे /विक्रम गोखले /सुधीर गाडगीळ

★ **पर्सोनॅलिटी /करीयर डेव्हलपमेंट**
-दिनेश ओक (ऑस्ट्रेलिया)

★ **परदेशातील उच्च शिक्षण-मार्गदर्शन**
-दिलीप ओक / श्रीधर पाटणकर

★ **शिक्षण आणि व्यवसायाच्या वेगवेगळ्या वाटा**
दीपक गद्रे / वसंतराव बेडेकर /सुभाष दांडेकर

★ **संगीत कार्यशाळा**
-प्रमोद रानडे / अनुराधा मराठे

**सत्र दुसरे**

दुपारी ३.०० ते सायं. ७-३० पर्यंत

★ **भगवान परशुराम पूजन**

★ **महासंमेलनाचे उद्घाटन**
-जागतिक कीर्तीच्या व्यक्तींच्या हस्ते दीपप्रज्वलन.

★ **५००गुरुजींकडून मंत्रजागरपठण.**

★ **व्याख्यान-**
**“राष्ट्रासाठी चित्पावनांचे योगदान**
-विद्यावाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर

★ **पुरस्कार वितरण**

★ **जागतिक कीर्तीच्या चार दिग्गजांच्या मुलाखती**
सादरकर्ते-सुधीर गाडगीळ

★ **कार्यक्रमास उपस्थित सर्व चित्पावन कलाकारांचा एकत्रित कार्यक्रम**

★ **चित्पावन संगीत रजनी**
-ज्येष्ठ गायिका साधना सरगम

-०-

**भोजनः १२.३० ते २.३०**

# आमचे याहू!

ले. वृषाली मराठे (पृ.५०३) जोगेश्वरी-पू. मुंबई दूरध्वनी-२८२६९४०२



*(मागील हितगुज अंक ६१ मध्ये मुखपृष्ठावर नागपूर लोकसत्ताने लक्ष्य केलेल्या 'वा.ग.' ना आपण पाहिले आहेच.मराठे प्रतिष्ठानच्या स्थापनेच्या कल्पनेपासूनच्या काळापासून गेल्या पंचवीस वर्षांत 'वा.ग.' यांचा अक्षरशः शेकडो परिवारीयांशी संपर्क आला असेल. त्या सर्वांना वेळोवेळी त्यांचे दर्शन घडले असेल ते वेगवेगळे. या लेखात त्यांच्या सौ. नी त्यांचे शब्द चित्र रंगविले आहे ते वाचक सदस्याना उद्बोधक वाटेल.-सह संपादक)*

वाचून जरा गंमत वाटली असेल पण मी ह्यांना अहो! म्हणून हाक मारली तरी ऐकू येणार नाही. पण याहू ! म्हणून हाक मारली तर नक्की ऐकू जाईल. बँकेत असताना कंप्यूटर बेसिक नॉलेज असलेले हे आज वेगवेगळ्या साईट शोधून माहिती गोळा करतात, आपल्या मित्रांना, मुलाला-सुनेला सांगत असतात. रिटायर्ड झाल्यावर त्यांना नोकरीच्या बंधनात पडायचं नव्हतं. पण रिकामं बसवत नव्हतं. म्हणून मग कंप्यूटरमधील लहानलहान कोर्स पूर्ण केले. नंतर ह्यूमन राईट्सचा १ वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. शिक्षणाची आवड व जे तरुणपणी जमलं नाही ते यावेळी करण्याची जिद्द याला तोड नाही. गेल्या वर्षी मोडीच्या दोन परीक्षा दिल्या. का? तर वडिलोपार्जित मोडीमध्ये लिहिलेले हस्तलिखित कागदपत्र वाचता यावेत, म्हणून! डिग्निटी फाउंडेशन या ज्येष्ठ नागरिकांच्या संस्थेचे सदस्य झाल्यावर त्यांच्या मुखपत्रात एक दोन लेख प्रसिद्ध केले. मराठे प्रतिष्ठान तर आपलं घरचंच. त्यामुळे हितगुजच्या माध्यमातून काहीतरी लिखाण चालूच असतं. गंमत म्हणजे गेल्याच वर्षी फुलझाडांच्या शेतीचा तळेगांव येथे कोर्स असल्याचे कळले म्हणून आम्ही पुण्याहून येताना सहज त्या संस्थेत शिरलो. त्या वातावरणाने यांना इतकं भारावून सोडलं की लगेच तिथल्यातिथे वरिष्ठांना विचारून त्या कोर्ससाठी प्रवेश घेतला. कदाचित मुंबईचा कंटाळा आला तर गांवाला जाऊन फुलांची शेती करतील व आपल्या सभासदांना ती फुले भेंट देता येतील!

आता ३४ वर्षे झाली आम्ही एकमेकांचे जीवनसाथी आहोत. एका मैत्रिणीच्या मध्यस्थीने पत्रिका दाखवून नंतर बघण्याचा कार्यक्रम तिच्याच घरी झाला. त्यावेळी मी, माझे वडील, हे, मैत्रिण, आणि तिची आई एवढेच जण होतो. दुसऱ्याच दिवशी ह्यांनी पसंती कळवली. हे माझ्या ऑफिसमध्ये आले. बऱ्याचवेळी संध्याकाळी भेटत असू. नंतर एक दोन महिन्यांनी लग्न झालं. त्यांची अशी समजूत की ज्या मुलीला आई नसेल ती मुलगी संसार चांगला करील. कदाचित म्हणूनच त्यांनी मला पसंत केली असेल. पण दोघांचं समजूतदारपणे वागणं, दुसऱ्याची मर्जी सांभाळणं हेही तितकंच महत्त्वाचं आहे. ते हे नेहमीच करतात. लग्नानंतर काही कारणाने आम्हाला माझ्या वडिलांच्या घरी राहावं लागलं. पण ह्यांनी व माझ्या वडिलांनी एकमेकांना समजून घेतलं. कांही वेळा विचार पटले नाहीत तरी विरोध दाखवायचा नाही. हाच गुण आमच्या मुलात उतरला आहे. आज तो मोठा इंजिनियर झाला आहे पण तो सुद्धा घरातल्या, काम करणाऱ्यांचाही आदर करतो, जितका तो त्याच्या बॉसचा करतो. कधीमधी तो परदेशी जातो. पण घरी असला की तो मला घरकामात सुद्धा मदत करतो. क्वचित स्वयंपाकही करतो. तो रोज स्नान केल्यावर घरातील मोठ्यांना नित्य नेमाने नमस्कार करतो. आमची सुनबाई गौरीसुद्धा फार गुणी आहे. ती आम्हाला तिचे दुसरे आई बाबाच मानते. त्यामुळे आमची मुलीची हौस फिटली. ती फार्मसीची असल्यामुळे आम्ही बारिक सारिक औषधांसाठी तिचा सल्ला घेतो. असे आमचे याहू डॉट कॉम कुटुंब आहे.

-०-

---

***(संपादकीय- पृ.१ वरून)***

त्याना मराठे प्रतिष्ठानच्या वतीने शुभेच्छा देण्याच्या शनिमित्ताने मी व श्री. प्रभाकर तेथे गेलो. सुनीलने हितगुजसाठी मुलाखत द्यावी या आमच्या विनंतीला अखेर त्याना मान द्यावा लागला. मराठ्यांच्या माहेरवाशिणीचे ते सुपुत्र आहेत, यशस्वी उद्योजक आहेत. पण स्वभाव अतिशय संकोची व नम्र. त्यांच्याशी बोलतांना मला जाणवले की ते स्वतःविषयी फार कमी आणि राखून बोलत आहेत. त्याना बोलते करायला मला थोडे कष्ट पडले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलूंवर पुरेसा 'प्रकाशझोत' पडला नाही, अशी माझी भावना झाली. त्यांचे संपन्न, कर्तबगार व्यक्तिमत्व याहून अधिक मोठे आहे हे जाणवत होते. असो.


मराठे कुलपरिवारात अशीच कर्तृत्ववान, व्यावसायिक, खेळाडू, नट, गायक, कलावंत मंडळी असतील, ज्यांची माहिती आमच्यापर्यंत पोहोचली नसेल. त्या सर्वांनी अशी माहीती आम्हाला अवश्य कळवावी. आम्ही ती यथावकाश प्रसिद्ध करूच. कारण हे आपले सर्वांचे सर्वांसाठी सर्वांशी हितगुज आहे.- संपादिका.

-०-


**पणजोबा**

**प्रभाकर शिवराम मराठे**

**यांच्या स्मरणार्थ**



**प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई ४०००३१

सेलः ९८२० २३२ ०८२ दूरध्वनी : २ ४१५ ०८८९


**संगणक साक्षर ज्येष्ठ नागरिकांना आवाहन**

आपले संगणक ज्ञान आपल्या मुला-नातवंडांची मेल पहाण्यापुरतेच मर्यादित आहे का ? या वयातहि आपण अधिक जाणीवपूर्वक माहीतीचा शोध घेऊ शकता. पण नेमके काय करायचे ते माहीत नसते. कोणाला विचारायचे तर संकोच वाटतो. मुले तर, बाबा तुम्ही मी सांगितले तेवढेच करा.नाहीतर कांप्युटर बिघडेल असा धाकच देतात. आपण बिनधास्त मेल करा. आम्ही आपला वेळ सत्कारणी लावू. -सहसंपादक, हितगुज

# प्रकाशझोत (२)

## यशस्वी उद्योजक आणि साहसी गिर्यारोहक श्री. सुनील जोशी (पृ.२७७)

(मराठे प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री आनंदराव मराठे यांचे भाचे)

शब्दांकन: -डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे(पृ.१२०), वडाळा. दूरध्वनी:२४१५०८८९

"अपयश नव्हे, तर संकुचित ध्येय हा गुन्हा आहे. तसंच उंच आकांक्षा पण तोकडे प्रयत्न हाही अपराधच आहे", असं म्हटलं जातं. ठाण्याचे श्री.सुनील जोशी या साहसी गिर्यारोहक व यशस्वी उद्योजकाने यातली कोणतीच चूक केली नव्हती. कारण त्याचं स्वप्न मोठं आहे, प्रयत्न अफाट आहेत आणि आजपावेतो मिळालेलं यशही वादातीत आहे.

श्री सुनील मुकुंद जोशी हे ठाण्याचे. त्यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९५९चा. ठाणे महाविद्यालयातून ते कॉमर्स पदवीधर झाले. अभ्यासापेक्षा त्यांचे मन साहसी खेळात रमे. उंच पर्वतांच्या रांगा, डोंगर, नद्या यांचे त्यांना बालपणापासूनच आकर्षण वाटे. त्यामुळे गिर्यारोहणाची आवड त्यांना स्वस्थ बसू देईना. स्वतः उत्तम गिर्यारोहक म्हणून, महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील, अगदी युरोपातील आल्प्स पर्वतांपर्यंत त्यांनी गिर्यारोहण केले आहे. सर्व डोंगररांगांवर कूच करून यशस्वी चढाई आजही ते करीत आहेत.

### विजयी विक्रम

२८६० किमी चा इंटरनॅशनल वॉक पार करायची स्पर्धा १९८५ मध्ये नॉर्वे येथे घेतली गेली होती. एकूण ४०० जणांचा सहभाग असलेली ही स्पर्धा पुरी करणारे फक्त तिघे विजयी वीर होते. त्यामधील एक होते आपले सुनील! त्यांनी विजयी विक्रम प्रस्थापित केला आणि अभिमानाने त्यांचे नांव झळकले गेले. सुनीलनी अशा अनेक मोहिमा आखून गिर्यारोहकांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण केले आहे. ठाणे येथे त्यांनी प्रस्तरारोहण (रॉक क्लायमिंग) वॉल बांधली आहे. ठाणे पोलिस स्कूलमधील पोलिसांना ते या वॉलचे प्रशिक्षण नियमितपणे देत असतात.

### यशस्वी उद्योजक

आपल्याकडे साहसी खेळांचे प्रकार ॲडव्हेंचर, हायकिंग इत्यादींबद्दल फारशी माहिती नाही म्हणून ते नाराजी व्यक्त करतात. अमेरिकेत बोस्टन या शहरात Association of Challenge Cource Technology (ACCT) ह्या संस्थेतर्फे नुकतीच एक परिषद भरली होती. सुनील जोशींनी इंटरनेटवरून संपर्क साधला व ते स्वखर्चाने परिषदेमध्ये दाखल झाले. तेथे त्यांनी आपला पेपर वाचून दाखविण्याची इच्छा व्यक्त केली. पण संयोजकांनी हे शक्य नसल्याचे सांगितले. हार पत्करणे किंवा माघार घेणे हे स्वभावातच नसलेल्या सुनीलनी संयोजकांकडे फक्त पांच मिनिटांचे निवेदन करण्याची विनंती केली व विशेष म्हणजे ती मान्य झाली. ते म्हणाले, "हायकिंगसाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचा तुटवडा जाणवतो. हायकर्सना, गिर्यारोहकाना ज्या वस्तू गरजेच्या असतात त्या मिळत नाहीत. मिळाल्या तरी त्या पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसतात. ही अडचण लक्षात घेऊन मी स्वतः या वस्तू तयार करीत असतो व मागणीप्रमाणे पुरवठा करू शकतो. गुणवत्तेत या वस्तू सरस असण्याची मी हमी देतो."

या पाच मिनिटांच्या भाषणाचा परिषदेतील सर्व जणांवर उत्तम प्रभाव पडून अमेरिकेतील शाह या चार्टर्ड अकाउंटंटने त्याना मदत करण्याचे ठरविले आणि अमेरिकेत या व्यवसायाची शाखा काढली.

श्री सुनील जोशी हे सर्व साहसी खेळांच्या सामुग्रीचे, तंबू, कॅमेरा बॅग, पाठीवरची बॅग, वेस्टपाऊच, स्लीपिंग बॅग, फोल्डिंग टूल्स ,हॅमॉक्स, रॉक क्लायमिंग गियर, वॉटर बॉटल अशा अनेक आवश्यक वस्तू ते स्वतः त्यांच्या ठाणे येथील कारखान्यात बनवितात. तेथे आज २५ कामगार आहेत.

जगभरात, इंग्लंड, रशिया, जर्मनी, यासारख्या देशात अमेरिकेप्रमाणेच शाखा काढून आपला माल पुरवायची त्यांची महत्त्वाकांक्षा आहे.

### पुरस्कार

त्यांच्या या कार्याची आपल्याकडेही नोंद घेतली गेली. २००३ साली त्यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचा डहाणूकर पुरस्कार प्राप्त झाला. तसेच त्याना २००५ सालचा उद्योगश्री पुरस्कार मा. उपमुख्यमंत्री आर आर पाटील यांच्या हस्ते प्रदान करून गौरविण्यात आले.

या यशस्वी उद्योजकामागे त्यांची पत्नी सौ. भारती जोशी यांचा सहभाग मोठा आहे. त्या स्वतः ठाणे येथील शोरूम सांभाळतात, कारखान्यातली देखरेख पहातात. घरातली सर्व जबाबदारी (त्याना मानसी नावाची एक लहान मुलगीही आहे) व गृहिणीपद सांभाळून उद्योजक पतीला त्यांची ही मोलाची साथ व्यावसायिक यशासाठी फार उपयोगी ठरली आहे.

मराठे परिवाराशी नाते सांगणाऱ्या सुनील जोशी यांचे आम्ही कौतुक करतो व त्यांची स्वप्ने, महत्त्वाकांक्षा पूर्ण होण्यासाठी सुयश चिंतितो. त्यांच्या या कार्यापासून तरुणांनी प्रेरणा घ्यावी यासाठी त्यांचा संपर्क पत्ता खाली देत आहे.

M/s Great Outdoors India, Shop No.1,
Gautam Villa Soc.,Ghantali Devi Rd.,
Thane (W), 400 602.
Unit No.1- 4, Sachin Ind. Estate, 2nd Flr
Kolbad Rd., Thane (W), 400 601.
Tele: 25422072 / 65297654
Cell: 92233192
E-mail (1) info@greatoutdoorsindia.com
(2) sanjosi@yahoo.com

**दादर शो-रूमचा पत्ता:**
**शॉप नं.१०,सनराईज हाईट्स,**
**ज्ञानमंदिर रोड, दादर-पश्चिम,**
**मुंबई ४०००२८ फोन:६५१७८१००**



श्री सुनील जोशी यांची प्रशिक्षणार्थीसाठी ठाणे येथे बांधलेली रॉक क्लायमिंग वॉल.

# ENGLISH SECTION

## Awesome! B_O_M_B_A_Y

*-by Vaa Ga Marathe (P. 504) Jogeshwari-E, phone 28269402*

Bombay has no bombs and is a harbour not a bay
Churchgate has neither a church nor a gate.
It is a railway station
There is no darkness in Andheri
Lalbaag is neither red nor a garden
No king ever stayed at Kings Circle.
Nor did Queen Victoria stay at Victoria Terminus.
Nor is there any princess at Princess Street
Lower Parel is at the same level as Parel
There are no marines or sailors at Marine Lines.
The Mahalaxmi temple is at Haji Ali not at Mahalaxmi.
There are no pigs traded at Dukar bazaar.
Teen Batti is a junction of 3 roads, not three lamps.
Trams used to terminate at Kings Circle not Dadar Tram Terminus (DadarTT)
Breach Candy is not a sweetmeat market,
but there is a Hospital.
Safed Pool has the dirtiest and blackest water.
You cannot buy coal at Kolsa street.
There are no Iron smiths at Lohar chawl.
There are no pot makers at Kumbhar wada.
Lokhandwala complex is not an Iron and steel market.
Null bazaar does not sell taps.
You will not find ladyfingers at Bheendi Bazaar.
Kalachowki does not have a black Police station.
Hanging Gardens are not suspended.
Mirchi Gully does not sell chillies.
Figs do not grow in Anjir Wadi.
Sitafals do not grow in Sitafal Wadi,
Jackfruits do not grow at Fanaswadi.
But it is true that you may get fleeced at Chor Bazaar!

## AAMCHI MUMBAI

A City where everything is possible, especially the impossible
Where lovers first love and then marry,
Where there is place for every Tom, Dick and Harry
Where telephone bills make a person ill,
Where a person cannot sleep without a pill.
Where carbon-dioxide is more than oxygen,
Where the road is considered to be a dustbin,
Where college canteens are full and classes empty,
Where Adam teasing is also making an entry,
Where a cycle reaches faster than a car,
Where everyone thinks himself to be a star,
Where sky scrapers overlook the slum,
Where houses collapse as the monsoon comes,
Where people first act and then think,
Where there is more water in the pen than ink,
Where the roads see-saw in monsoon,
Where the beggars become rich soon,
Where the roads are levelled when the minister arrives,
Where college admission means hard cash,
Where cement is frequently mixed with ash.
This is Mumbai my dear, But don't fear, just cheer,
Come to Mumbai every year!

THINGS TO PROVE YOU'RE A BOMBAYITE

## Interesting !!! Olny srmat poelpe can.

*-Ramakant M Vidwans(p.623) Mahim . Phone 24305260*

**In the pragrapgh given below, the spelling of the words is jumbled but still one can easily read it.**

I cdnuolt blveiee taht I cluod aulaclty uesdnatnrd waht I was rdanieg.
The phaonmneal pweor of the hmuan mnid, aoccdrnig to a rscheearch at CmabrigdeUinervtisy, is taht it deosn't mttaer in waht oredr the ltteers in a wrod are, the olny iprmoatnt tihng is taht the frist and lsat ltteer be in the rghit pclae.The rset can be a taotl mses and you can sitll raed it wouthit a porbelm.
Tihs is bcuseae the huamn mnid deos not raed ervey lteter by istlef, but the wrod as a wlohe.Amzanig huh? yaeh and I awlyas tghuhot slpeling was ipmorantt!
**if you can raed tihs psas it on !!**

-0-

## Three Sardarjis in Singapore

Collected by- S G Khambete

Three Sardarjis went for a tour to Singapore. They searched for rooms everywhere and finally got one which is in the topmost floor of a 100 floor hotel. After taking rest they started for a local visit. While leaving the hotel, the manager informed them that they should reach the hotel before 10.00 pm or else lift will not be available and they have to take the steps for which they agreed and went out.

After all the entertainment in the city, they reached back late at 10.30.Since lift was not available, they decided to take the stairways under the condition that each Sardarji has to tell a story that lasts for 33 floors so that they can reach the 100th floor without much trouble.

After first sardarji finished his story in 33rd floor, the third sardarji said, "I have a sad story to say, but I will tell at the end only". Then second sardarji finished his story and the third finished his story and finally they reached the 100th floor.

Then first sardarji asked what was the sad story. The third one said, " I forgot the room key which is on the manager's table". They once again started back to the first floor and this time the second sardarji after crossing 33 floors from top said," I got a sad story, but I will also say that at the end". They finally reached the first floor and when asked about the sad story, the second sardarji said, "The keys were in my pocket only".

With anger and full tired, they once again start from the first floor. After reaching the 33rd floor, the third sardarji said, " I too have a sad story, but I will say at the end only". Then they reached the 100th floor and the second one asked the third sardarji about the sad story. He replied:

"This is not our hotel, It is on the other side of road, opposite to this".

**-0-**

# Cricket jokes

**Collected by- S G Khambete**

**1.** What did the spectator miss when he went to the toilet?
*The entire Indian Innings.*

**2.** Where do Indian batsmen perform their best?
In Advertisements

**3**. When would Agarkar have 100 runs against his name?
*When he is bowling.*

**4**. What is the most proficient form of footwork dis played by Indian batsmen?
The walk back to the Pavilion

**5**. How to increase the chances of Indian batsmen playing out the entire 50 overs?
*Try giving them two innings to begin with, then try three, four and so on.*

**6**. What is the Indian version of a hat-trick? Tossing 3 wickets in 3 balls.

**7.** What is the height of optimism
*Sehwag coming out to bat applying sunscreen on his face.*

**8.** Phone Call from Mrs. Sehwag (S) to the Indian Team Manager

(ITM)- "Hello

Mrs.S- "Can I talk to Sehwag, please ? "

ITM: - "Sorry, he is just going to bat"

Mrs.S- "No problem Manager, I'll hold on"




**9.** Family Court conversation between the Judge (J) and the little girl (LG)

*****

*****

J- "Now that your parents are getting divorced do you want to live with your mummy?"

LG- "No, my mummy beats me."

J.- "Well then, I guess you want to live with your daddy."

LG - "No, my daddy beats me too."

J. "Well then, who do you want to live with?"

LG "I want to live with the Indian Cricket team, they never beat anybody !!!"

**-0-**

# "Seven Donts" after meal !

**Collected by- S G Khambete**

**1.** **<u>Do not smoke after a meal</u>!**

Experiments from experts prove that smoking a cigarette after a meal is comparable to smoking TEN cigarettes. (Chances of Cancer are high.)

**2**. **<u>Do not eat fruits immediately after meals</u>.**

It will bloat your stomach. Therefore have your fruits one or two hours after your meals.

**3.** **<u>Do not drink tea after a meal.</u>**

Tea leaves contain a high content of acid.This substance will cause the protein content in the food we consume to be hardened , making it difficult to digest.

**4**. **<u>Do not loosen yout belt after eating</u>.**

Looseing the belt after a meal can cause intestinal problems.

**5.** **<u>Do not bathe after eating</u>.**

Bathing will cause the increase of blood flow to the hands, legs and body thereby causing the blood around the stomach to decrease. This will weaken the digestive system in our stomach.

**6.** **<u>Do not walk after a meal</u>** , even though you have heard people say that after a meal, walking a hudred steps make you live till 99.

Walking immediately after a meal will make it difficult for the digestive system to absorb the nutrition from the food we eat. wait at least onwe hour after your meal and then walk if you want to.

**7.** **<u>Do not sleep immediately after meals</u>.**

The intake of food will not be able to digest proerly thereby leading to gastro-intestinal problems.

**-0-**

# माझी अविस्मरणीय युरोप सहल

सौ. ललिता विजय मराठे (पृ. ३९०)पुणे , दूरध्वनी २४४७६९८८

आम्ही दोघे २००४ मध्ये नोकरीतून निवृत्त झालो. व संसारातील जबाबदारीतून मोकळे झालो. डॉ.अनिल अवचटांच्या भाषेत बोलायचे तर,

*आता उतार सुरू, किती छान,*
*चढणे ही भानगड नाही*
*आता नुसता उतार,*
*कुठले शिखर जिंकायचे नाही.*

अशा मानसिक अवस्थेला आम्ही पोहोचलो होतो. अशातच केसरीची युरोप सहलीची जाहिरात वाचली.. जिवाचे युरोप करण्याचे ठरविले.

सहल १० सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २००६ अशी १५ दिवसांची होती. आम्ही जानेवारीत पहिला हप्ता प्रत्येकी २०००० रुपये भरला. कारण त्यामुळे एकूण सहलीच्या खर्चातूनआम्हाला प्रत्येकी १०००० रुपये सूट मिळणार होती. आम्ही पैसे भरल्यामुळे सहलीला जाण्याचे निश्चित झाले व आमचा प्रत्येक दिवस सहलमय झाला. मित्रमैत्रिणी, नातेवाईक, यांच्या कडून अनेक प्रेमळ सल्ले मिळू लागले व सहलीसाठी खरेदीची गडबड उडाली. थर्मल इनर पासून चहा, बूट, एक ना दोन, अनेक वस्तूंची खरेदी झाली.

सहलीचा सप्टेंबर महिना उजाडला. ४ सप्टेंबरला मला अपघात झाला. रिक्षाने मागून येऊन मला धक्का दिला व डाव्या पायाच्या अंगठ्याला व पावलाला तीन ठिकाणी फ्रॅक्चर झाले. पायाला प्लॅस्टर घालावे लागले. घरातील वातावरण बदलून गेले. उलटसुलट चर्चा सुरू झाली व शेवटी डॉक्टरांच्या सल्ल्याने कुबड्या घेऊन सहलीला जायचेच असे मी ठरविले. अशाप्रकारे ९ सप्टेंबरला माझी अविस्मरणीय सहल सुरू झाली! सहारा विमानतळापासून पुढे सर्व विमानतळांवर मला चाकाची खुर्ची मिळाली व विमान कर्मचाऱ्यांकडून चांगली वागणूकही मिळाली.

केसरीच्या टूर लीडरने-श्री.विवेक कोचरेकरने-माझी आईसारखी काळजी घेतली. हॉटेलमध्ये खालच्या मजल्यावर खोली देण्यापासून बसमध्ये पुढची सीट देण्यापर्यंत माझी सोय पहाण्यात आली. सहप्रवाशांनी मदतीचा हात दिला. पोटातील पाणी हलणार नाही अशी बस, दृष्ट लागावेत असे सुंदर खाचखळगे नसलेले लांबलचक रस्ते, स्वच्छ सुंदर निसर्ग, प्रदूषण विरहित हवा व आधुनिक सुखसोयी यामुळे पायाचे दुःख मी विसरून गेले.

आम्ही युरोपमध्ये खालील प्रमाणे प्रवास केला. सहारा विमानतळाहून 'A1-Italia' एअरवेजने मिलान (इटली) शहरात गेलो. तेथून विमानाने दीड तासात लंडनला गेलो. तेथे बिगबेन घड्याळ, थेम्स नदी, तिच्यावरील पूल,बकिंगहॅम पॅलेस, जायंट व्हील, वॅक्स म्युझियम वगैरे पाहिले.

लंडनहून आम्ही पॅरिसला यूरोस्टार रेल्वेने गेलो. पॅरिसला लिडो शो पाहिला. आयफेल टॉवर, व तेथेच सीन नदीवर एक तासाची क्रूझ केली. पॅरिसला आम्ही लाँगडिस्टन्स कोच केली व पुढे १० दिवस त्या बसने ४हजार किमीचा प्रवास करून युरोप पाहिला. पॅरिसहून ॲम्स्टरडॅम (हॉलंड देश) पाहिले. तेथे लाकडी बुटांचा कारखाना व हॉलंडची प्रतिकृती-मदुरोडॅम-पाहिली. त्यांतर बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स पाहिली. जर्मनीमधील कोलोन पाहिल्यावर युरोपच्या नंदनवनातले-स्वित्झर्लंडमधील- एंजलबर्ग येथे मुक्काम केला. तेथे आल्प्स पर्वतरांगानी वेढलेल्या सुंदर ठिकाणी टेरेस ह्या हॉटेलमध्ये उंच डोंगरांच्या छायेत दोन दिवस मुक्काम केला. तेथे माऊंट टिटलीज व ट्रेनने १२००० फुटावर असलेली बर्फाच्छादित पर्वतशिखरे सुद्धा पाहिली. स्वित्झर्लंडहून रोम, व्हेनिस व फ्लॉरेन्स ही इटलीमधील पौराणिक व ऐतिहासिक महत्त्वाची शहरे पाहिली. तेथून इटलीमधील मिलान शहरात आलो. तेथून दुबईला जाणाऱ्या विमानाने प्रवास करून दोन दिवसाचा दुबई मुक्काम केला.सारजा पाहिले व डेझर्ट सफारीची मजा लुटली. दुबईचा एअरपोर्ट पाहून थक्क झालो व २५ सप्टेंबरला इंडियन एयरवेजच्या विमानाने मुंबईला परतलो.

युरोप सहलीमध्ये कोणत्या गोष्टीनी मनाला भुरळ पाडली असे जर कुणी विचारले तर पहिली गोष्ट म्हणजे हॉलंडपासूनच्या प्रवासात आम्हाला तेथील सायकलीनी आकर्षून घेतले. सायकलींसाठी स्वतंत्र रस्ते होते. सायकलीसुद्धा फार छान होत्या. म्हाताऱ्यांपासून तरुणांपर्यंत सर्वजण मजेत सायकली चालवीत होते. प्रवासात तीन मजली सायकल स्टँडसुद्धा पाहिला.

हॉलंड ते स्वित्झर्लंडच्या प्रवासात सुंदर फुलांच्या ताटव्यानी डोळे तृप्त झाले. रस्त्याच्या कडेला तसेच दिव्यांच्या खांबांवर उतरत्या छपरांच्या घरांच्या गॅलरीत, घरांपुढील बागेत सर्वत्र फुलांचे ताटवे असा हा युरोप सुंदर आहे. युरोपियन लोकांच्यांत निसर्गप्रेम आहे. सार्वजनिक स्वच्छतेचे भान आहे. घरे, रस्ते, खाजगी व सार्वजनिक इमारती सगळीकडे त्यांची सौंदर्यदृष्टी दिसून येते. आरोग्याची काळजी घेऊन त्यांनी डॉक्टरला दूर ठेवण्यात यश मिळवले आहे असे त्यांच्याकडे पाहून वाटते.

मात्र याचबरोबर वाढत्या व्यसनांनी त्यांच्या गुणांना छेद दिला आहे. त्यांचे एकटेपण, तुटकपण व ऐहिक जीवनच सर्व काही असे मानण्याची धारणा, आत्मकेंद्रित मनोवृत्ती पाहून दुःख वाटते. म्हणूनच युरोप पाहून आल्यावर म्हणावेसे वाटते-

" गड्यारे गांव आपुला बरा!"

-०-

# व्यक्तीचे श्रेष्ठत्व

प्रेषिका-कु. मधुरा प्रभाकर मराठे (पृ. १२०),वडाळा

न जात्या ब्राह्मणश्चास्मि क्षत्रियो वैश्य एव वा।
न शूद्रो नच वा म्लेंच्छो भेदाश्च गुणकर्मभिः।।

अर्थ- केवळ जन्मावरून कोणी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अथवा म्लेंच्छ होत नाही, तर त्याच्या गुणकर्मांनी होत असतो.

हिंदू धर्मात जन्मजात उच्चनीचतेला थारा नव्हता. कर्मजात कर्तबगारीलाच प्राधान्य होते. हिंदूंचे ३० टक्के ग्रंथ, उदा. रामायण, महाभारत, गीता हे उच्च अथवा ब्राह्मण कुळात जन्म न घेतलेल्या थोरांनी लिहिले आहेत. काही ऋषीमुनींची जन्मकथा माणसे जन्मजात जातीवरून नाही तर गुणांनी मोठी होतात, हेच दर्शवितात. या जन्मकथा पहा-

१. कैवर्त-कोळी जातीच्या स्त्रीपासून महर्षी व्यास
२. श्वपक-चांडाळी स्त्रीपासून पराशर ऋषी.
३. शुकी-शूद्र स्त्रीपासून कणाद ऋषी.
४. हरिणी- हरिणीपासून ऋष्यशृंग ऋषी.
५. गणिका-एका वेश्येपासून वसिष्ठ ऋषी.
६. मंडूकी- मंडूकीपासून मांडव्य ऋषी.
७. लाविका- लाविकेपासून मुनिश्रेष्ठ मंदपाल.

वरील सर्व ऋषिश्रेष्ठांचे गर्भाधान संस्कार झालेले नव्हते. म्हणजे ते संस्काररहित होते. उच्च गोत्र, कुल नसूनही, व नीच कुलात जन्मूनही ते सर्व केवळ गुण, कर्म, शिक्षण, संतसंगति, साधना यांद्वारे महानता पदावर पोहोचले!

-०-

## महत्त्वाची सूचना (१)

ई-मेलची सोय असलेल्या वाचक-सदस्यानी आपल्या पूर्ण नाव-पत्ता-फोन सह या अंकाची पोहोच द्यावी. तसेच आपल्या परिवारातील सर्व सदस्यांच्या जन्मतारखा व नोकरी-शिक्षणानिमित्त अन्यत्र राहणाऱ्या परिवार सदस्यांचे ई-मेल व फोन नंबर पत्यासह कळविल्यास त्यांना हा व यापूर्वीचे ( डिसेंबर २००६ व मार्च २००७ चे) अंक पीडीएफ फाईलमध्ये पाठविण्यात येईल.-सहसंपादक)

1. maratheparivar@yahoo.co.in
2. sitaram_khambete@yahoo.com )

## महत्त्वाची सूचना (२)

इ-मेलची सोय असलेल्या वाचक-सदस्यानी आपल्या परिवारातील विवाहित कन्या-बहिणी (माहेरवाशिणी) तसेच परदेशी रहात असलेल्या मुलगे/मुली/ बंधू/भगिनी या सर्व सदस्यांच्या पत्यासह जन्मतारखा, ई-मेल व फोन नंबर खालील ई-मेलवर पाठविल्यास त्यांना हा व यापूर्वीचे दोन्ही अंक पीडीएफ फाईलमध्ये पाठविण्यात येईल. हीच माहिती ई-मेल नसल्यास साध्या पोष्टाने मुखपृष्ठावरील पत्त्यावर पाठवावी.-सहसंपादक.

# सीतेचे पूर्ववृत्त

सौ. प्रतिभा सुधाकर मराठे ठाणे(पृ.१२१), दूरध्वनीः २५४२०७७१

फार पूर्वी पद्माक्ष नांवाच्या राजाने तप करुन लक्ष्मीला प्रसन्न केले.व वर मागितला. "मी तुला कन्या रूपाने प्राप्त करू इच्छितो. तू माझी कन्या हो."

लक्ष्मी- "भगवान विष्णूच्या आज्ञेनेच मी अवतार घेते. तू विष्णूला प्रसन्न करून घे."

पद्माक्ष राजाने विष्णूला प्रसन्न करून घेतले व वर मागितला, "लक्ष्मी माझी कन्या व्हावी."

विष्णूने राजाला मातुलिंग फळ आणून दिले व " यातून लक्ष्मी बालिका स्वरूपात अवतीर्ण होईल", असे सांगितले.

राजाने ते फळ घेऊन घरी आला. त्याने यथावकाश ते फळ फोडले. त्याची दोन शकले झाली. त्यातून एक दिव्य कन्या उत्पन्न झाली.राजाने तिचे नांव पद्मावती ठेवले. त्याने अत्यंत कौतुकाने तिचे लालन पालन केले.

जे मातुलिंग विष्णूने लक्ष्मीच्या अवतारासाठी दिले तेच भगवती देवीच्या मूर्तीत तिच्या हातात धरलेले असते. असो.

पद्मावती उपवर झाल्यावर राजाने तिचे स्वयंवर मांडले. 'पण' असा होता की, " ज्याचा स्वाभाववि‍क वर्ण नभासारखा निळा असेल त्याला पद्मावती माळ घालेल."

स्वयंवराला देशोदेशीचे राजे, देव, ऋषी आले होते.'पण' ऐकताच सर्वजण फार निराश झाले. त्यांनी राजाशी मोठे युद्ध केले. युद्धात राजा मरण पावला. पद्मावतीला पकडायला असुर धावले. तिने प्राण वाचविण्यासाठी अग्नीत उडी घेतली.

असुरांनी नगराची नासधूस केली. राजाबरोबर त्याच्या राण्यानी सहगमन केले. लक्ष्मीमुळे केवढी हानी होते हे लक्षात घेण्यासारखे आहे.

नंतर पद्मावती अग्नीतून बाहेर आली. व तेथेच बसून राहिली. त्यावेळी लंकेचा राजा रावण विमानातून जात होता. त्याच्या सारण नांवाच्या प्रधानाने अग्निकुंडाजवळ बसलेली कन्या रावणाला दाखविली. आणि पद्माक्ष राजाचा व नगराचा नाश हिच्यामुळेच झाला, असे सांगितले.

रावण तिच्याकडे आकृष्ट झाला. खाली उतरून तिचा अनुनय करू लागला. तेंव्हा तिने पुनः कुंडात उडी घेतली! रावणाने कुंड विझवून तिचा शोध घेतला. ती सापडली नाही पण त्या कुंडातून रावणाला अत्यंत तेजस्वी अशी पाच रत्ने सापडली. रावण चकित झाला व ती रत्ने घेऊन तो लंकेला गेला.रावणाने ती रत्ने मंदोदरीला दाखविली व तिला त्यांचे अलंकार करावयास सांगितले. तिने ती रत्ने एका पेटीत ठेऊन ती पेटी देवघरात ठेवली.

काही दिवसांनी मंदोदरी ती रत्ने घेण्यासाठी गेली असता ती पेटी इतकी जड झाली की तिला ती उघडता येईना. मग रावणानेही प्रयत्न केला पण त्याला ती उचलेना. तेंव्हा प्रधानादि अनेक लोक जमले व मोठ्या प्रयत्नाने त्यांनी ती पेटी उघडली, तो काय! त्या पेटीत एक दिव्य बालिका दिसली. तेव्हा मंदोदरी म्हणाली, "ही बालिका भयंकर संहारक शक्ती आहे. तिला राष्ट्राबाहेर कोठे तरी दूर सोडून या."

रावणाला तिचे म्हणणे पटले. त्याने ती पेटी विमानात ठेवली व काही सहायक घेऊन तो निघाला. तेंव्हा पेटीतून आवाज आला, " मी या लंकेत परत येईन व लंकेचा निःपात करीन." तो आवाज ऐकून सगळे घाबरले व त्यानी राज्याच्या सीमा ओलांडून विदेह राज्यातील एका शेतात ती पेटी पुरून टाकली व रावण लंकेला निघून गेला.

ते शेत जनकाच्या मालकीचे होते. ते त्याने एका ब्राह्मणाला दान दिले होते. त्या ब्राह्मणाला यज्ञ करावयाचा असल्यामुळे तो त्या शेतात भूमी साफ करण्यासाठी आला व त्याने तेथे नांगर चालविला. नांगराच्याफाळाला टण्ण् असा आवाज आला. त्याने खणले तेंव्हा त्याला तीच पेटी सापडली.

पेटी राजाचीच आहे असे मानून तो पेटी घेऊन जनकाकडे आला व म्हणाला, "महाराज, ही पेटी शेतात सापडली तेंव्हा ती तुम्ही घ्यावी."

जनक राजा म्हणाला, " शेत तुझे आहे, म्हणून पेटी तुझीच आहे, तू घेऊन जा."

ब्राह्मण म्हणाला, "जमीन माझी असली तरी भूमिगत धन राजाचे असते." राजाने साधू संतांना विचारले. त्यांनी पेटी उघडून आत काय आहे ते पहावे, असा सल्ला दिला. पेटी उघडली तेंव्हा त्यात एक दिव्य बालिका दिसली. राजाने तिला तत्काळ उचलले व ही मुलगी माझीच आहे असे घोषित केले. राज्यात कन्या आगमनाचा मोठा उत्सव केला.

अशी ही सीता! जनकाने पालन केले म्हणून तिला जनकजा, जानकी, मैथिली, वैदेही ही नांवे प्राप्त झाली. ती भूमीत सापडली म्हणून भूमिकन्या , तर शेतामध्ये सापडली म्हणून "सीता" ठरली. अशी ही जानकी जन्माची कहाणी. (- भावार्थ रामायणकथासार

**हितगुज-वितरण-स्वयंसेवकांसाठी**

आपल्या शहरातील/उपनगरातील सदस्यांचे अंक स्वतःनेऊन देऊ इच्छिणाऱ्या स्वयंसेवकानी विचारणा केल्यास त्याना यादी पाठविली जाईल.च पुढील (सप्टेंबर) अंकात प्रसिद्धकेली जाईल. इच्छुक सदस्यांनी १५-८-०७ पूर्वी कळवावे.-सह संपादक

# जीवन

सौ. प्राची आडपवार , चिंचवड, दूरध्वनी २७१७०१७७
( मुकुंद सीताराम मराठे (पृ. १८२)यांची कन्या)

जीवन हे फुलासारखं असतं पण फूल नसतं.
फूल व्हायला सात जन्माचं पुण्य लागतं.
पण ते काहींच्याच नशिबी असतं.
दुसऱ्यांना सुगंध देऊन स्वतःआनंद मानत असतं.
तर देवाच्या चरणी अर्पण होण्यातच समाधान मानतं.
परंतू तेसुद्धा एक फूलच असतं.
कारण
निर्जीव झाल्यावर त्याला निर्माल्याचं रूप मिळतं

तसं आपलं जीवन नसतं.
ताजं असेपर्यंत आस्वाद घेत जगत असतं.
परंतु जीवनाचा आस्वाद संपल्यानंतर
निर्माल्य होण्याचं भाग्य नसतं.
म्हणून जोपर्यंत ते मिळतं
त्यात समाधान मानायचं असतं
तुझं माझं न करता सर्व अनुभवायचं असतं.
प्रत्येक क्षण अनुभव घेत जगायचं असतं
जे मिळालं नाही त्यासाठी दोष देत बसायचं नसतं.
प्रत्येक परिस्थितीला सामोरं जायचं
धाडस करायचं असतं.
नशीब देणं हे देवाच्या हातात असतं.
पण ते घडविणं हे आपल्या हातात असतं.
त्यासाठी सर्वांचं सहकार्य मिळवायचं असतं.
व सर्वांमध्येच आपलं सुख अनुभवायचं असतं.
ते असंच व्यर्थ गालवायचं नसतं.
नव्या उमेदीने जगायचं असतं.
आयुष्याच्या शेवटच्या वळणापर्यंत
दुसऱ्यांना साथ देत कर्तव्य निभावून
चांगलं नांव मागे सोडून
एकट्यानं जायचं असतं.

अक्षरगणेश- २ः कपिल



# वळण



-डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे(पृ.१२०), वडाळा. दूरध्वनी:२४१५०८८९

काल मंजुषाचा वाढदिवस होता. दि. १३ ऑगस्ट. ती १४ वर्षाची झाली. आई वडिलांची ती एकुलती एक मुलगी. लाडाकोडात वाढत असलेली. तिच्या ग्रुपमधल्या सगळ्या मैत्रिणी वाढदिवसाला आल्या होत्या.पावभाजीचा घमगमाट घरभर सुटला होता. केक विकत आणला होता. घर सजविले होते.

मंजुषाला फिकट गुलाबी रंगाचा त्यावर नाजुक फुलांची नक्षी असलेला पंजाबी ड्रेस घालायचा होता. पण मम्मीने तिला मिडी आणि त्यावर तंग टॉप घालायची आज्ञा केली. मम्मीची आज्ञा, आज्ञा कसली हुकूमच तो- मानावा लागतो. नाहीतर मम्मीचा मूड ऑफ होतो आणि आज वाढदिवसाच्या दिवशी मैत्रिणींसमोर नाटक नको म्हणून तिने नित्याप्रमाणे मम्मीचे ऐकले. खरं तर तिला तंग टॉप आणि मिडी असल्या पोषाखात अनइझी वाटायचे. शालीन स्वभावाच्या मंजुषाला पंजाबी ड्रेस आवडायचा. कारण त्यात ओढणी घेऊन सौंदर्य झाकता येते. तिला शरीर प्रदर्शन अजिबात आवडायचे नाही. त्याउलट तिच्या मम्मीची आवड आणि ती साधी, सरळ, निरलस मुलगी म्हणून तिची आवड ती हक्काने मंजुषावर लादायची.

मंजुषाला तिचे स्वतःचे असे अस्तित्व नव्हते, तिचे स्वतंत्र मत नव्हते. आईबरहुकूम तिला वागावे लागे. घरात आईची सत्ता. आईने घराचा कब्जा घेतला होता. तिचे वडिलही आई सांगेल त्याप्रमाणे वागायचे. आईचे सगळे ऐकायचे. त्यामुळे भांडण नाही. डोक्याला ताप नको हे त्यामागचे धोरण असायचे. आई आक्रमक स्वभावाची. मी म्हणेन तीच पूर्व. फार हट्टी, दुराग्रही स्वभाव, स्वतःचा स्वार्थ आणि सोय पहाणारी. नेहेमी इतर सर्वांचे चूक माझेच बरोबर हा तिचा बाणा. तिच्या माहेरीही हम करे सो कायदा या न्यायानेच ती वागायची. लहानपणी तिच्या भावंडांना तिच्याशी जमवून घ्यावे लागे. आई वडिलही फारसे तिच्या फंदात पडत नसत. आईचा नाइलाज झाला की वैतागून म्हणे, "सासरी कसे होणार या मुलीचे? काळजी वाटते मला - सुखाने नांदू तरी देईल का सगळ्यांना?" त्यावर "असतो एकेकाचा स्वभाव, स्वभावो दुरतिक्रमः काय करणार?" असे वडिल हताशपणे म्हणत.

"पण आपल्या अशा स्वभावामुळे दुसऱ्याला काय त्रास होतो याची कल्पना येत नाही तिला?"

"दुसऱ्यांच्या मनाचा विचार केला तर ना?" आई वडिलांच्यात असे संवाद होत असत.

दिसायला सुरेख असल्यामुळे मंजुषाच्या आईचे लग्न लवकर झाले. सुधीरसारखा शिकलेला, समजुतदार नवराही मिळाला. वर्षाच्या आत मंजुषाचा जन्म झाला. आईचे रुप आणि वडिलांचे गुण तिने घेतले होते. शांतपणा आणि सोशिकता हे वडिलांचे अनुवंशिक गुण तिच्यात उतरले होते.

बिच्चारी मंजुषा! लहानपणापासून मम्मीचे सर्व ऐकावे लागायचे तिला. पप्पांना सांगण्यात, मम्मीविरुध्द तक्रार करण्यात काही अर्थ नव्हता हे तिला बालवयातच कळून चुकले होते. पप्पा म्हणजे 'जोरुका गुलाम' होते. एव्हढे शिकलेले, कॉलेजात प्रोफेसर म्हणून प्रतिष्ठा पावलेले पण मम्मीपुढे किती लाचार आणि दुबळे होतात हे ती पहायची. याचे तिला सखेद आश्चर्य वाटायचे.

" का नाही ते मम्मीला विरोध करीत? का नाही एकदा तरी मम्मीचे मन ते मोडत? त्यांच्यात हिम्मतच नाही मम्मीविरुध्द बंड करण्याची, का ती सांगते ते सर्व त्यांना पटते? कुणास ठाऊक? मी तर लहान, परावलंबी पण पप्पा मोठे आणि स्वावलंबी, स्वतंत्र विचारांचे कमावते तरी मम्मीपुढे असे हीनदीन कां होतात?" तिला प्रश्न पडायचा.

टी.व्ही. वर एका पाठोपाठ एक जाहिराती यायला लागाव्यात तसे तिच्या मनात प्रश्न गर्दी करु लागत.

"मी सांगेन ते तू ऐकलेच पाहिजेस, कशी ऐकणार नाहीस ते पहाते.... माझ्याशी गाठ आहे तुझी." असा मम्मीने मला घातलेला धाक ... .पप्पांनाही असाच दम दिला असेल का? माझ्या मनालाही मम्मीला प्रश्न करण्याचे सामर्थ्य नाही. मुकी बिचारी कुणीही हाका अशी माझी अवस्था झाली आहे."

मंजुषाची आई 'मॉडर्न' वाटावं यासाठी धडपडायची, नसत्या फॅशन्स करायची, मॉडर्न वुमन दिसण्यासाठी खटपट करायची. तिच्या मनात मॉडर्नपणाविषयी काही वेगळ्याच भन्नाट कल्पना होत्या. तिच्या मैत्रिणीही उच्चभ्रू वर्गातल्या, हायफाय बोलणाऱ्या, शोभेच्या बाहुल्या होत्या.

तिला आई म्हटलेले चालायचे नाही. आई अशी हाक मारलेली आवडायची नाही. तिची मंजुषाला सक्त ताकीद होती, मला 'मम्मा' आणि सुधीरला 'डॅड' म्हणायचे. मंजुषाने मम्मी म्हणायची सवय केली. पण सुधीरना डॅड म्हणणे पटकन तोंडात यायचे नाही. त्यावर क्वचित 'पप्पा' म्हटले तर चालेल अशी तडजोड झाली.

मंजुषाची आई तर सुधीरला अरे-तुरे च करायची अगदी वडिलधाऱ्या माणसांसमोरही. मुलीलाही आधुनिक काळानुसार वागता यावे, तिला मॉडर्नपणे वागण्याचे "वळण" लागावे म्हणून मंजुषानेही डॅडी हाक मारावी असे तिला वाटे. बाबा हाक मारणे म्हणजे जुनाट, गावंढळपणाचे, मागासलेपणाचे लक्षण असे ती समजायची.

मॉडर्नपणाचे भूत मंजुषाच्या आईच्या मानेवर बसले होते ते बिचाऱ्या मंजुषाला सतावित होते.

शाळेचा मंजुषाला तिटकारा नव्हता. मंजुषाला शाळा आवडायची. मधल्या सुट्टीत ती मैत्रिणींच्या घोळक्यात रमायची. शाळेच्या युनिफॉर्ममध्ये तिला मोकळेपणी वावरता यायचे. तिला बहिण-भाऊ कोणीच नसल्यामुळे घरात एकट एकट वाटायचं

अशीच एकदा शाळा सुटल्यावर मंजुषा हसत खेळत घरी आली. दाराची बेल वाजविली. मम्मीने दार उघडले. मंजुषाला बघून "शी !" असे म्हणून ती जोराने किंचाळली. मंजुषा कावरी बावरी झाली आणि गोंधळून गेली. तिला वाटले अगावर झुरळ बिरळ चढले की काय, की युनिफॉर्मवर घाणेरडे मातीचे डाग पडले.

पण लगेच मंजुषाच्या आईने मंजुषाच्या कपाळावरची टिकली रागाने काढून फेकून दिली आणि म्हटले, " शी! जुन्या पुराण्या काकूबाईं सारखी कुंकवाची टिकली काय लावतेस? आचरटासारखे नवीन नवीन प्रकार काय करतेस एकेक? मी सांगितले का तुला टिकली लावायला? मग? स्वतःची अक्कल पाजळू नकोस उगाच! अभ्यास चांगला करुन परिक्षेत दिवे लावा अकलेचे! ८० मार्कस् पडलेच पाहिजेत."

मंजुषाला मम्मीचा फार राग आला होता. एकाद्या दुष्ट कैदाशिणीसारखी मम्मी तिला वाटली. टी.व्ही.तल्या 'सोनपरी' ला बोलावून मम्मीला चांगली अद्दल घडवावी, असे तिच्या मनात आले.

खरेतर मंजुषाला टिकली लावलेली आवडायची. टिकली लावून जेव्हा ती आरशात पहायची तेव्हा तिला आपण सुंदर, मोहक दिसतो हे जाणवायचे. तिच्या प्रिय मैत्रिणीने तिला वेगवेगळ्या रंगाच्या टिकल्यांची पाकिटे भेट म्हणून दिली होती. आणि त्या त्या ड्रेसला मॅचिंग टिकली ती लावीत असे. पण मम्मीने आज तिचा असा हिरमोड केला होता. असहाय्य,

अगतिक अशी मंजुषा फुटत असलेले रडू आवरण्यासाठी चटकन बाथरुममधे गेली आणि तिने पोटभर रडून घेतले. मम्मीसमोर रडायचीही चोरी! "काय रडूबाई रडू " करत तिने हिणवले असते.

मंजुषाला कायम स्लिव्हलेस कपडे ती शिवत असे. स्वतःही स्लिव्हलेस कपडे वापरायची. मंजुषाला स्लिव्हलेसचा तिटकारा असायचा. पण करणार काय बापडी? मम्मीच तिच्या कपड्यांचे सिलेक्शन करायची. तिला निवड नव्हतीच. मम्मीने आणलेले कपडे मुकाट्याने घालायचे. कपडे भारी किंमतीचे, आकर्षक, फॅशनेबल असायचे. पण मंजुषाची आवड विचारात घेतली जायची नाही. तिला कसलेच स्वातंत्र्य नव्हते. तिच्या मतांना, तिच्या विचारांना, तिच्या आवडीला किंमत शून्य. तिला स्वतंत्र अस्तित्व आहे हेच नाकारले जायचे मुळी. त्यामुळे शरीराचे खायचे प्यायचे लाड झाले तरी मनाने मंजुषा कुढत बसायची. खंतावायची.

एकांतात असली की ती विचार करायची, मम्मीचे किती दिवस ऐकून घ्यायचे? का मी दुबळी-पामर बनले आहे? मम्मी जे सांगेल ते निमुटपणे-चुपचापपणे ऐकायचे व मुकाट्याने सहन करायचे असे किती दिवस चालणार? पप्पांना तर तिच्या अशा वागण्याची सवयच होऊन गेली आहे. ते तिच्या पूर्णपणे आधीन झाले आहेत. मम्मी हा पप्पांचा विकपॉईंट आहे त्यांनी तिला स्वीकारली आहे दोषांसकट! मग मलाच कां त्रास होतो? आपण मात्र आई झाल्यावर आपल्या मुलीला असा त्रास कधीही द्यायचा नाही. तिला समजून घ्यायचे. असा निश्चय ती मनात करायची त्यामुळे तिला बरे वाटायचे.

"तू तुला काय हवे ते घाल, पाहिजे ती फॅशन कर पण मला कां सक्ती? मला स्लिव्हलेसचा तिटकारा आहे गोरापान दंड उघडा ठेवलेला मला आवडत नाही." असे तिच्या मनात यायचे पण मम्मीच्या तोंडावर बोलण्याची तिची हिम्मत होत नव्हती. ती मनातच चरफडायची. मुकाट्याने तिचे ऐकायची.

परवा मंजुषाच्या शाळेत एक दिवसाचे संस्कार शिबीर होते. विद्यार्थ्यांप्रमाणे पालकांनाही ते सक्तीचे होते. वेळेवर आधीपासूनच मंजुषाने तसे मम्मीला सांगितले होते. तब्येत बरी नाही म्हणून ती आली नाही. पण या शिबीराला शिक्षकांप्रमाणे पालक आणि मुलांचाही प्रतिसाद उत्तम मिळाला होता. समारोपाच्या प्रसंगी शिबीर यशस्वी झाल्याबद्दल धन्यवाद देऊन पाहुण्या अध्यक्ष बाईंनी आपल्या सुंदर भाषणात सांगितले,"आपली मुल चांगली व्हावीत असे वाटत असेल तर , मुलांवर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागते. आपला मुलगा किंवा मुलगी कुणाची संगत घरतो, जातो कुठे, काय बोलतो, कसा वागतो, अभ्यास कसा आणि किती करतो या सगळ्यावर लक्ष ठेवावे लागते. ती पालकांची जबाबदारी आहे. मुलांना वळण लावण्यात आईचा फार मोठा वाटा आहे. मुलांना लहानपणी रामायण-महाभारततल्या, पंचतंत्र-इसापनीतीतल्या गोष्टी सांगितल्या तर मुलांच्या घडणीत त्याचा चांगला परिणाम होतो. त्या कथा म्हणजे नीतीकथा आहेत. बोधकथा आहेत. त्यात चांगली शिकवण आहे. पालकांनी मुलगा आणि मुलगी असा भेद करू नये. मुलीतूनच उद्या पूर्ण विकसित स्त्री घडत असते. मुलींनी त्यांच्या स्त्रीत्वाला नाही तर गुणवत्तेच्या विचाराला अग्रक्रम दिला पाहिजे. स्त्रीत्वाचा गैरवापर करून स्वतःला हीन दर्जा मिळणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. मुलींनी शालीनतेला साजेल, शोभा येईल असा पोषाख केला पाहिजे. पुरुषांच्या वासना उत्तेजित होतील असे कपडे घालणे टाळावे, सिनेमा टी.व्हीवर स्त्रीचे विकृतीकरण होते आहे हे नवीन पिढीच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत हानीकारक आहे, घातक आहे. मुलींनी त्याचे अंधानुकरण करू नये. मुलींना स्वसंरक्षण शिकवावे. त्यांना आत्मबळ आणि आत्मविश्वासाची देणगी द्यावी. मृदृता आणि दुर्बलता या दोन सर्वस्वी भिन्न गोष्टी आहेत. मानसिक धैर्य, शारीरिक कणखरपणा, खंबीरपणा हे गुण मुलींमधे असायला हवेत. केवळ फॅशन्सचे कपडे घालून तुम्ही आकर्षक दिसणार नाहीत. ते बाह्य सौंदर्य आहे. पण आतंरिक सौंदर्य तुमच्या व्यक्तिमत्वाला उठाव देणारे आहे हे ध्यानात ठेवा.

"मुलांना शिस्त लावताना आईने अतिरेक टाळावा. आपल्या आवडीनिवडी मुलांवर लादू नयेत. त्यांनाही मन असते, भावना असते,त्या भावनांची जपणुक करावी. त्यांना स्वतंत्र, मोकळेपणी विचार करायला द्यावा."

टाळ्यांच्या कडकडाटात भाषण संपले. मंजुषा भारावून गेली होती. तिला प्रकर्षाने वाटले आता आपली मम्मी हवी होती हे सगळे ऐकायला. तिच्या कानावर हे भाषण पडायला हवेच होते.

भारावलेल्या मनःस्थितीतच मंजुषाला घर कधी आले ते समजलेच नाही. पहाते तर दाराला कुलुप. तब्येत बरी नसताना मम्मी कुठे गेली? डॉक्टरकडे गेली असावी असे तिला वाटले. मंजुषाने तिच्या पाकीटातून ड्युप्लिकेट चावी काढून दार उघडले.

खूप उशिरा मम्मी परतली. तिच्या मैत्रिणीं बरोबर ती साड्यांचे आणि ड्रेस मटेरियलस्-कपड्यांचे प्रदर्शन पहायला गेली होती. पैशाची वारेमाप उधळण करून कपडे खरेदी केले होते. अद्ययावत फॅशनचे. मंजुषाला नवीन फॅशनची बरमोडा पँट आणली. नाखुषीने, नाराजीने तिने घातली. मांडी, पोटऱ्या पाय सगळे उघडे दिसत होते. पण मम्मी फारच खूष होती.

"वा व्व वा! किती चिकनी दिसतेस ग या ड्रेसमधे मंजू तू! अशाच प्रकारच्या आणखीन बरमोडा पँटस् आणीन तुला ... छान शोभून दिसतात. हीच फॅशन पण जोरात चालू आहे सध्या. तुझे सौंदर्य काय खुलून दिसते सांगू?" आईचे कौतुकाचे शब्द.

पण मंजुषा आतल्या आत रागाचे कढ दाबीत गप्पगप्प होती. तिला वाटले जोराने ओरडावे. कां नाही आपण पेटून उठत? मम्मीला विरोध करण्याचे सामर्थ्य आपल्या अंगात कां नाही येत? ही भारी किंमतीची दळभद्री बरमोडा पँट, आग लावावी तिला. पण हे सगळ आतल्या आत मनातच! तिच्या मनातल्या नागाने क्षणभरच फणा काढला. पण लागलीच त्याचे गांडूळ कधी झाले ते मंजुषाला समजले नाही. ती गलितगात्र झाली. निमुटपणे मम्मीचे ऐकणे हा मंजुषाचा स्थायीभावच झाला होता.

बरमोडा पँट घालून ती क्लासला जायची तेव्हा रस्त्यातल्या सर्वांच्या नजरा तिला बोचायच्या. तिला चोरट्यासारखे वाटायचे. तिच्या काही मैत्रिणींना मंजुषाचा हेवा वाटायचा. कारण असले कपडे घालायला त्यांच्या घरातून विरोध असायचा. परवा अक्षदा म्हणाली सुध्दा, "तुझी काय मजा आहे ग! माझी मम्मी तुझ्या मम्मीसारखी पाहिजे होती. म्हणजे सर्व प्रकारच्या फॅशन्स् मला करता आल्या असत्या. सारखे पंजाबी ड्रेस घालून मला अगदी कंटाळा आला आहे. साधी जीन्स् ची पँटही घालायची बंदी! यू आर सो लकी!" मैत्रिणींची अशी वक्तव्ये ऐकली की मंजुषा तिच्या दुःखाचे कढ मनातच दाबायची.

कित्येकदा तर वासनांनी बरबटलेल्या पुरुषी नजरा तिच्या उघड्या अंगावर पडायच्या तेव्हा सीतेला धरणीमातेने पोटात घेतले तसे आपले आता व्हावे असे तिला वाटायचे. वयात आलेल्या मुग्ध कलिकेची ही व्यथा तिच्या मम्मीला समजत नव्हती? ती स्त्री नाही? तिला भावना नाहीत? की सवंग फॅशनच्या आहारी जाऊन तिच्यातील वात्सल्यही करपून गेले आहे! मंजुषावर किती अन्याय व्हायचा!

मंजुषाला वाटायचे आपणच कां एव्हढ्या हळव्या, संवेदनाक्षम वृत्तीच्या? मला निर्लज्ज कां होता येत नाही? बालपणी तिची अवस्था केविलवाणी होती. मम्मी सांगेल पिवळा फ्रॉक घाल की तोच घालावा लागे. मंजुषाने सुचविलेला दुसरा पर्याय चालत नसे. आणि आज मोठ्ठी झाले, वयात आले तरी मला कां नाही स्वतःच्या मानाप्रमाणे वागता येत? पप्पांप्रमाणे मलाही मम्मीच्या ओंजळीने पाणी प्यावे लागते?

आपले आयुष्य अगदी उजाड झाले आहे. त्यात आता काही उरले नाही. आपण निर्जीव ,कळसुत्री बाहुली झालो आहोत असे हताशपणे वाटून मंजुषा रडू लागली. दुःखाच्या राहून राहून येणाऱ्या उमाळ्याबरोबर मंजुषाचे सारे शरीर वादळात सापडलेल्या रोपट्याप्रमाणे कापत होते.

रडता रडता तिला झोप लागली. तिच्या गालावर अश्रूंचे सुकलेले ओघळ होते, पण चेहरा

*(पुढील मजकूर पृ. २० वर)*

# मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००८

## १०० रुपयात आपले नांव छापलेली डायरी मिळवा.

मराठे प्रतिष्ठान पुणे शाखेने २००६ सालची डायरी काढून सुरुवात केली.ही डायरी बहुतेक सर्वांनाच आवडली म्हणून हा उपक्रम २००७ची डायरी काढून पुढे चालवला.

आता २००८ सालची डायरी काढण्याचा निश्चय पक्का केला आहे. या डायरीमध्ये प्रत्येक दिवसासाठी (शनिवार व रविवार सहित) पूर्ण पान असेल. पृष्ठदानाची कल्पनाही राबवली जाईल. ही डायरी ४०० पानांची असून त्यातील ३६५ पाने पृष्ठदानाची असतील. ३५ पानांमध्ये विविध विषयांवरील उपयुक्त माहिती व जाहिराती असतील. अनेक कुलबांधवांच्या सूचनेनुसार डायरीला गेल्या वर्षी प्रमाणेच प्लॅस्टिक कव्हर किंवा लॅमिनेशन केलेले असेल.

यंदाही **पृष्ठदानासाठी १०० रु.** निश्चित केले आहेत. आपल्या स्वतःचा, मुलांचा, बायको, बहीण, भाऊ, आई, वडील यांचे वाढदिवस किंवा कोणाच्या स्मृतिप्रीत्यर्थ तारखा कळवून आपण पृष्ठदान करू शकाल. गेल्या वर्षीच्या डायरीत पृष्ठदान केलेले असेल त्यांनी यंदाही पुन्हा करण्यास काहीच हरकत नाही. लवकरात लवकर आपण पृष्ठदानाच्या तारखा कळवल्या म्हणजे त्याच दिवशीच्या पानावर घालता येतील. आपण तारखा कळवल्यानंतर रिकामी असेल तर त्या तारखेला नाहीतर त्याच्या जवळपास जी तारीख रिकामी असेल तेथे आपली खरी तारीख कंसात देऊन नाव, फोन, व्यवसाय/नोकरी - पद व वैशिष्ट्य छापले ााईल. **याशिवाय आपल्या इच्छेनुसार आपण आपला ई-मेल कळविल्यास त्याचाही छापावयाच्या माहितीत समावेश करता येईल** तरी आपली माहिती कळवून जास्तीत जास्त पृष्ठदानासाठी नोंदणी करावी.

डायरीमध्ये जाहिरात छापण्यासाठीचे सुधारित दर लवकरच निश्चित करण्यात येतील व इच्छुक जाहिरातदारांना फोनवर कळविण्यात येतील. गतवर्षीच्या डायरीचे दर संदर्भासाठी खाली दिले आहेत. *(१.डायरीचे मलपृष्ठ रंगीत ७००० रु. २.डायरीचे मुखपृष्ठ व मलपृष्ठाचे आतील पान रंगीत ५००० रु. ३.रंगीत पूर्ण पान ३५०० रु. ४.काळे पांढरे पूर्ण पान३००० रु. ५. काळे पांढरे अर्धे पान १५०० रु. ६.काळे पांढरे पाव पान ५०० रु. ७.शुभेच्छा पट्टी ३०० रु. ८.पृष्ठदान १०० रु.)*

बाहेरगांवच्या लोकांनी पृष्ठदान किंवा जाहिरातीचे पैसे पाठवताना शक्यतो ड्राफ्ट किंवा मनिऑर्डरने पाठवावे. चेकने बँकेत कमीशन खूप कापले जाते असा अनुभव आहे. मनिऑर्डरने पैसे पाठवल्यास आमच्याकडे जो भाग राहतो त्यावरही आपले पूर्ण नाव, पत्ता, रक्कम व तपशील लिहावा म्हणजे नोंदणी करणे सुलभ होते.



नीलांबरी रमेश मराठे पुणे.
फोन- ०२०-२४४५६२७०

डायरीच्या सुरुवातीच्या पानांतल्या माहितीत कोणत्या विषयांचा समावेश असावा, त्या विषयाची माहिती कोणाकडे मिळेल याबद्दल आपले विचार आणि आपल्या अन्य काही सूचना असतील तर त्याही कळवाव्या.

गेल्या वर्षी वेळेअभावी सर्व कुलबांधवांशी आम्ही संपर्क साधू शकलो नाही. यावर्षी जास्तीत जास्त कुलबांधवांना डायरीमध्ये सहभागी होता यावे म्हणून हे निवेदन लवकर देत आहोत. तरी **आपण १५ ऑगस्ट पर्यंत पृष्ठदान, जाहिराती व आवश्यक माहिती पाठवावी** म्हणजे छपाईसाठी पुरेसा वेळ मिळू शकेल.

आपल्या ज्या कुलबांधवांकडे हितगुज जात नसेल त्यांनाही आपण वरील माहिती द्यावी अशी नम्र विनंती आहे. लोभ आहेच वृद्धी व्हावी.

**- सौ. नीलांबरी रमेश,** पुणे

**संपर्क व पत्रव्यवहारासाठी पत्ता :-**


१. **सौ. नीलांबरी रमेश मराठे**
व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र,६४२, नारायण पेठ,
प्राथमिक नूमवि समोर,अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११ ०३०.फोन : २४४५६२७०

२. **श्री. अरुण दत्तात्रय मराठे**
१७५९ सदाशिव पेठ, भिकारदास मारुती जवळ, पुणे ४११ ०३०.फोन : २४४७३२८१

३. **श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे**
त्रिवेणी नं. १, डेक्कन पाटबंधारे सोसायटी,
एस.एन.डी.टी. कॉलेज समोर, एरंडवणे,
सर्व्हे नं. ३६/९, पुणे - ४११ ०३८
फोन-२५४६४७०६; मो.: ९८२२७७७३६१


***

**अक्षरगणेश-३: हेरंब**




**मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००७ चे मुद्रक**

# रोहन ग्राफिक्स

**शॉप नं.१५, आदित्य, ५०१**
**रास्ता पेठ, पुणे ४११०११**
**फोनः २६१२८०९३**

**मोबाईल प्रमोद-९८९०६८८९०५: रोहन-९८९०७१४१९३**

***सर्व प्रकारची प्रिंटिंगची कामे केली जातात.***

# सदस्य-संवाद

**सी.गो.खांबेटे,(पृ.६७६) अंधेरी -मुंबई ४०००६९ दूरध्वनी-२६८३६९९४**
e-mail :(1) sitaram_khambete@yahoo.com (2) maratheparivar@yahoo.co.in

**(१)**

कुमुद डोके (पृ. ३६६), ठाणे
दूरध्वनीः २५३९ ९९८१ दि. ६ जून २००७,
स.न.वि.वि.

हितगुज मार्च २००७ वाचला. उद्बोधक, रंजक व वैविध्यपूर्ण अंक वाचण्याचे समाधान झाले. संपादिका व सहायक खांबेटे सर या अनुभवी, ध्येयवादी, सहृदय मंडळींच्या कामाचे चोखंदळ वाचक स्वागतच करतील.

नवा अधिक मास-नवा विचार, मंदोदरीची जन्मकथा-जी अज्ञात होती, खजुराहोची प्रवासवर्णनपर व ऐतिहासिक,रंजक, बोधप्रद माहिती भावली. 'आजी नाही म्हणून' कविता हृद्य वाटली. 'पुनर्भेट' ही लघुकथा सुंदर गती घेत गेली. याखेरीज अन्य शाखा संमेलनांची सविस्तर माहिती- डॉ. रमा मराठेंच्या सविस्तर भाषणासह, 'नांदा सौख्यभरे', विक्रमी मराठी वैमानिक 'अतुल प्रकाश', या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन. यापूर्वीच्या ल.शं. मराठे यांच्या संपादन कौशल्याचा वसा नवीन संपादक मंडळ यशस्वी रीत्या चालविते आहे. यापूर्वीची सदरे व नावीन्याची आस धरून सुरू केलेले 'प्रकाशझोत' सदर, सद्य घटनांचा वेधक आस्वाद - 'मराठी साहित्य संमेलनातील इंग्रजी वाचन संस्कृती' अंतर्मुख करायला लावतात.

लेखकांचे फोन क्रमांक संपर्क करण्यास उपयोगी पडले. प्रत्यक्ष शंका-समाधान झाले. कलाविषयक काही माहिती, किंवा मदत लागल्यास जरूर देईन. सर्व चित्पावन कुलांच्या जागतिक महासंमेलनात वक्तृत्व, काव्य व चित्रकलेच्या स्पर्धा करता आल्यास आनंद वाटेल. पुढील अंकाची वाट पहात आहोत. पुनःश्च धन्यवाद.

-०-

**(२)**

विठ्ठल महादेव मराठे (पृ.२३५) ,सांगली
दूरध्वनीः ०२३३-२३०००७२, दि. ३ एप्रिल ०७
स.न.वि.वि.

मार्च २००७ चा हितगुजचा अंक अचानकपणे माझ्या ई-मेलवर बघण्यास मिळाला. अंकाचे देखणे स्वरूप पाहून आनंद झाला. ई-मेलवर अंक बघण्याची सवय नसणाऱ्या मला एक नवीन अनुभव आला. सर्व अंक मी तेथेच चाळला. त्याबद्दल (इंग्रजीमध्ये) प्रतिक्रिया मी ई-मेलने कळविली आहेच.

एवढे लिहून झाल्यावर ते पूर्ण करायचे राहून गेले होते.... ... दरम्यान छापील प्रत पोस्टाने मिळाली. मागील अंक वाटपाचे काम सभासदांवर न सोपविता प्रत्येकाला पोस्टाने पाठविण्याचे प्रतिष्ठानने ठरविलेले दिसते. गेली काही वर्षे सांगली, मिरज विश्रामबाग येथील सभासदांचे अंक माझ्या पत्त्यावर येत होते व ते वाटपाचे काम मी सांगली येथील सभासद श्री. श्रीकांत दत्तात्रेय ( पृ.५५३) व मिरज येथील सुहास बळवंत (पृ.८३) यांच्या सहकार्याने करीत होतो. त्या निमित्ताने सभासदांच्या घरापर्यंत जाण्याचा योग तीन महिन्यातून येत होता. व अंक वाटण्याच्या कर्तव्याच्या व आपलेपणाच्या भूमिकेत असताना दोन-दोन, तीन-तीन जिने चढून जाण्याचे श्रम जाणवत नव्हते. कांही लांबचे अंक बुकपोष्टाने पाठवीत होतो.

या अंकातील सदस्य-संवाद मध्ये लिहिलेल्या माझ्या पत्राप्रमाणे प्रतिष्ठानशी मराठीतून ई-मेलद्वारा संवाद कोणत्या सॉफ्टवेअरद्वारे साधायचा ते अजूनही उलगडले नाही त्याबाबत सभासदबंधूनी मला मार्गदर्शन करावे ही विनंती आहे.

-०-

**(३)**

भास्कर दत्तात्रेय मराठे (पृ.२१) मिरज,
दूरध्वनीः९५२३३-२२३१६९२ २८एप्रिल२००७
स.न.वि.वि.

हितगुजची वाट पहात होतोच व अपेक्षेप्रमाणे अंक दि. २३-४-२००७ रोजी हातात मिळाला. धन्यवाद. मार्च २००७ चा अंक विशेष वैशिष्ट्यपूर्ण वाटला. कारण यावेळचे लेख विशेष चांगले व मनास भिडणारे आहेत.

१. टेन्शन फ्री गंपू -गजानन भास्कर यांची लेखन पद्धती, विषय मांडणी व पूर्ण व्यक्ती उभी करण्याचे लेखणीतील सामर्थ्य वैशिष्ट्यपूर्ण व छान वाटले. खरंच असा माणूस २१ व्या शतकात व ब्राह्मण असू शकतो! सुखी माणसाचा सदरा म्हणून पूर्वी एक गोष्ट होती. पण हा तर प्रत्यक्षात गंपू गोखले- व्यक्ती! मोरयास एकच प्रार्थना - गंपू व सौ. गोखले शंभरी पूर्ण करोत!

२. English Section फार सुरेख. Sardar jokes, Seven wonders व Multipurpose Card हे लेख उल्लेखनीय आहेत.

३. मु.पो. परांजपेनगर- वास्तववादी कल्पना स्पष्ट करून परांजपेनगर खऱ्या अर्थाने प्रकाश झोतात आणले आहे. आभार.

४. मोहन सदाशिव यांनी सादर केलेले ऐतिहासिक ठिकाण खजुराहो- सविस्तर माहिती व त्याचा इतिहास वाचून मन आनंदित झाले. प्रत्यक्ष दर्शन झाल्याचा भास झाला. धन्यवाद.

एकंदरीत सर्वच अंक आदर्श व अभ्यासपूर्वक पद्धतीने सादर केलेला दिसतो. मराठे परिवाराविषयी सार्थ अभिमान व प्रेम आहे.

महासंमेलनाचे आमंत्रण आपण न विसरता स्वतंत्रपणे दिलेत. विशेष आभारी आहे.

गंपू दांपत्याचा एक फोटो असता तर फार बरे वाटले असते.असो.

**(४)**

कालिदास बा मराठे (पृ. ) ढवळी, गोवा
४०३४०१; दूरध्वनी-२३१३८०५
दि. २५ एप्रिल २००७
स.न.वि.वि.

हितगुज मार्च २००७चा अंक वेळेवर मिळाला. आपण संपादित केलेला पहिला अंक खूपच उशीरा मिळाला होता.

श्री. भाऊसाहेब मराठे व श्री. लक्ष्मण शंकर यांनी संपादित केलेल्या हितगुज अंकाचे वाचन करण्याचा जो आनंद मिळत होता तो आपल्या संपादनाखाली निघणाऱ्या अंकातही मिळतो आहे. याबद्दल आपले व आपले समर्थ सहकारी श्री. सीताराम खांबेटे यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

अर्थात आमच्या सारख्या वाचकांनी पण तेवढेच सहकार्य द्यायला हवे.

आपल्या संपादनामुळे अधिकाधिक भगिनी लिहित्या होतील असे वाटते.

-०-

**सहसंपादकांचे हितगुज**

प्रिय सदस्य /पत्रलेखक बंधू भगिनीनो,

आपल्या सर्वांच्या प्रतिक्रिया आमचा उत्साह वाढविणाऱ्या आहेत.

१२ वर्षे भाऊसाहेबांनी व १२ वर्षे लक्ष्मणरांवानी जोपासलेले व मजबूत पायावर उभे केलेले हितगुज आता पंचविशी ओलांडत आहे. आपल्या सर्वांच्या प्रेमळ व क्षमाशील दृष्टीला अनुसरून हितगुज यापुढे जरा नव्या वाटेने जाण्यासाठी प्रयत्न करणार आहे. अर्थात आपले सहकार्य हवेच.

सर्वप्रथम आपणापैकी प्रत्येकाचा आमच्याशी थेट संपर्क असणे आवश्यक आहे. ज्याना शक्य आहे त्यांनी ई-मेल करा. मराठी टायपिंग करता येत नसले तर रोमन लिपीतून मराठी टायपिंग करू शकता. किंवा आपण मराठी -हिंदीसाठी एखादे विशिष्ठ सॉफ्टवेअर वापरत असाल तर त्या फाँटची अ‍ॅटॅचमेंट पाठवा. आता आम्ही हितगुज ई-मेलवर पाठवू शकतो. आपली मुले मुली कामानिमित्त परगावी, परदेशी असतील तर त्याना आम्हाला ई-मेल करू द्या. ते सभासद नसले तरीही आम्ही अंकाची पीडीएफ फाईल फुकट पाठवू. गुणवत्ता पारितोषिकासाठी अर्ज, गुणपत्रिकेच्या प्रती व फोटो सुद्धा मेलवर पाठवा. आपले साहित्यही अवश्य पाठवा. अंकाची पाने किमान २४ असतील. त्यामुळे आता स्थान देणे शक्य आहे. आपला, *सी. गो. खांबेटे.*

# गुणवत्ता पारितोषिके आणि शैक्षणिक-वैद्यकीय मदत

## यांसाठी १५ ऑगस्ट २००७ पूर्वी अर्ज पाठवावे

**२००६-०७ मध्ये** १०वी (किमान ७०% गुण), १२वी (किमान ६०% गुण) पदविका, पदवी व पदव्युत्तर परीक्षा, तसेच विज्ञान, गणित, स्कॉलरशिप व व्यावसायिक स्पर्धा/परीक्षा यामधील गुणवत्ताधारक आणि क्रीडा, संगीत, नाट्य, अभिनय इ.**अभ्यासेतर क्षेत्रांत किमान जिल्हा स्तरावर विशेष नैपुण्य** मिळवणारे कुलबांधव यांना प्रतिष्ठानतर्फे गुणवत्ता पारितोषिके /बिनव्याजी कर्जे दिली जातात.

याशिवाय **कुलबांधवांनी प्रायोजित केलेली पुढील पारितोषिकेहि** देण्यात येतात-

**१.** श्री.सी.गो.खांबेटे (पृ.६७६) प्रायोजित

**कै.कु.अनिता खांबेटे स्मृती पारितोषिके-प्रत्येकी रु.२५०**

इ. १०वी, १२वी, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ४थी) व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ७वी) या परीक्षांत **मराठे परिवारांत सर्वाधिक** गुण मिळवणाऱ्यास.

**२.** सौ.सुलभा अनंत मराठे (पृ.३२७) प्रायोजित

**हिंदी पारितोषिक-रु. १००**

इ. १० वीच्या परीक्षेत १०० मार्कांच्या हिंदी विषयात **मराठे परिवारांत सर्वाधिक** गुणांसाठी.

**३.** श्री.प्रभाकर गणेश मराठे (पृ ६१) प्रायोजित

**गणेश तंत्र-शिक्षण पारितोषिक-रु.५००**

**पात्रतेचे निकष:-**

१) १० वीच्या परीक्षेत तांत्रिक (व्होकेशनल) विषय घेऊन मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास,

२) १०वीला तांत्रिक विषय नसले तरी १०वी नंतर मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक, कंप्युटर इंजिनियरिंग यांसारख्या अभियांत्रिकीच्या कोणत्याही विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १०वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवणाऱ्यास

*( मात्र १०वीला अभियांत्रिकी विषय घेणाऱ्यास अग्रक्रम देण्यांत यावा.)*

**४.**श्रीम.जयश्री जगन्नाथ मराठे(पृ.३७१) प्रायोजित

**कै.जगन्नाथ दामोदर शिष्यवृत्ती-वार्षिक रु.२०००**

ऑटोमोबाईल इंजिनियरिंग शिक्षण घेणाऱ्या (पदवी, पदविका अथवा आय.टी.आय.) विद्यार्थी / विद्यार्थिनीस.

**५.**श्रीम.शालिनी धुंडिराज मराठे(पृ.१३४)प्रायोजित

**वैदिक शिक्षण/हिंदुधर्मप्रचार यांसाठी पुरस्कार-वार्षिक रु.१०००.**

**६. शैक्षणिक (बिनव्याजी) कर्ज -**

**कै.विनय खांबेटे स्मृती योजनेतून मेडिकल/इंजिनिरिंग शिक्षणासाठी** बिनव्याजी कर्ज (रु. ३०,००० पर्यंत) दिले जाते.

गुणवत्ता पारितोषिके /बिनव्याजी कर्ज यांसाठीचे **अर्ज १५ ऑगस्ट २००६ पर्यंत** प्रतिष्ठानकडे पाठवावे. अर्ज फक्त **२००६-०७** या वर्षी झालेल्या परीक्षांबाबत असावे. स्वत: विद्यार्थी अथवा त्याचे/तिचे पालकांपैकी कोणी प्रतिष्ठानचे सभासद आहेत की नाहीत हे नमूद करावे..(मात्र पात्रतेसाठी सदस्यत्व ही अट नाही.)

निकालाच्या प्रमाणपत्राची प्रत **अर्जाला जोडून** पाठवावी. नुसतीच प्रमाणपत्राची प्रत पाठवू नये. सोबत आयडेंटिटी कार्ड आकाराचा फोटो पाठवावा. शक्य असेल त्यानी ही माहिती ई-मेल वरून पाठवावी म्हणजे मिळाल्याची खात्री करून घेता येईल.**खास बक्षिस योजनेखाली** (हिंदी , तांत्रिक विषय, ऑटो इंजि., वैदिक शिक्षण/हिंदुधर्म प्रचार याबाबत) **अर्ज केला असल्यास तसा उल्लेख अर्जात करावा.**

पत्रोत्तर देण्यासाठी **अर्जात पूर्ण पत्ता लिहावा.**

**शैक्षणिक, वैद्यकीय मदत**

गुणवत्ता पारितोषिकांप्रमाणेच प्रतिष्ठानतर्फे कुलबांधवांना शिक्षणासाठी तसेच आजारपणात मदत केली जाते. उत्पन्नाचा निकष न लावता गरजेचा प्राधान्याने विचार करून अशी मदत दिली जाते.

बायपास, कॅन्सर यासारख्या मोठ्या आजारासाठीहि खास निधीतून (विशिष्ट हेतु निधी) मदत मिळू शकते.

शैक्षणिक मदतीसाठी, वैद्यकीय खर्चासाठी आणि गरजू वृद्धांना सहाय्यासाठीहि कुलबांधवांनी नि:संकोचपणे प्रतिष्ठानला लिहावे.

-०-

*(प्रतिष्ठानवृत्त - पृ.३ वरून)*

## नांदा सौख्यभरे

**१.** सौ. मीनाक्षी आणि श्री.रमेश केशव खांबेटे (पृ.६७५)यांचे सुपुत्र **चि. प्रसाद याचा शुभविवाह शनिवार दि. १० मार्च २००७ रोजी** श्री. व्यंकटेश कुळकर्णी यांची कन्या **चि. सौ. दीप्ती** हिच्याबरोबर **श्रुति मंगल कार्यालय, पुणे** येथे संपन्न झाला.

**२.** प्रतिष्ठानचे कार्यकारिणी सदस्य व हितगुजचे सहसंपादक श्री. सी. गो. खांबेटे (पृ.६७६) यांची पुतणी (सौ. आरती व श्री. अरविंद गोपाळ खांबेटे, रसायनी,यांची कन्या) **चि.सौ.अस्मिता हिचा शुभविवाह शनिवार दि. २४ मार्च २००७ रोजी** सौ. अनुराधा व श्री. सुधाकर महादेव वेलणकर, डोंबिवली-पूर्व, यांचा ज्येष्ठ पुत्र **चि. मंदार** याचेबरोबर **ब्राह्मण सेवा मंडळ, दादर** येथे संपन्न झाला.

३. नानोडा-वाळपई (गोवा) येथील श्री. कृष्णा रामचंद्र मराठे (पृ. ५३७) यांचा पुत्र **रामचंद्र** याचा शुभ विवाह **रविवार दि. १० जून २००७** रोजी दाभोली येथील श्री.अनंत रामकृष्ण दामले यांची कन्या **चि.सौ.मधुरा** हिचे बरोबर श्री मनोहर दामले, रा.दोडामार्ग यांच्या घरी थाटात संपन्न झाला. **०००**

*(०००- हे वृत्त साप्ताहिक किरात (२१-६-२००७) वरून घेतले आहे. मात्र मूळचे बांबर-नान्होरे येथील श्री.कृष्णा रामचंद्र यांची तसेच त्यांचे बंधू प्रशांत, प्रवीण,केशव,वामन आणि चुलत बंधू गजानन दत्ताराम, मोहन दत्ताराम, सुनील दत्ताराम, व समीर दत्ताराम यांच्या बद्दल काहीही माहिती कुलवृत्तांत पृ. ५३७ वर उपलब्ध नसल्यामुळे वरील व्यक्तींच्या नातेवाइकांनी/परिचितानी त्यांचे पत्ते, फोन, ई-मेल संपर्क कळवावा. - सी .गो. खांबेटे , सह संपादक)*

या सर्व नवविवाहितांना शुभेच्छा.

*(पुढील पानावर पहा )*


# व्यंकटेश मार्गदर्शन केंद्र

*६४३, नारायण पेठ ,*
*नू.म.वि.प्राथमिक शाळेसमोर,*
*अप्पा बळवंत चौक, पुणे ४११०३०*
*दूरध्वनी :*
०२०-२४४५६२७०

**I.Q. व Aptitude Testing**

**करून शैक्षणिक मार्गदर्शन केले जाते.**

*संचालिका-*
*सौ. नीलांबरी रमेश मराठे*

*(मागील पानावरून )*

## सह वेदना

**१.** आंबेजोगाई (जि.बीड) येथील सभासद श्री.प्रभाकर महादेव मराठे (पृ.२३५) यांच्या पत्नी **सौ. प्रतिभा(वय६०) यांचे दि.९ मार्च २००७ रोजी** आंबेजोगाई येथे अपघाती निधन झाले. ते दोघे पहाटे फिरायला गेले असताना एका जीपने जोराची धडक दिल्यामुळे त्यांना जागीच मृत्यू आला. त्यांच्या मागे पती, पुत्र महेश व विवाहित कन्या निवेदिता आहे. श्री.प्रभाकर हे प्रतिष्ठानच्या सांगली केंद्राचे समन्वयक विठ्ठल महादेव यांचे कनिष्ठ बंधू होत.

**२.** सांगली येथील प्रतिष्ठानचे सभासद श्री. विद्याधर मुरलीधर मराठे (पृ.४५८) यांच्या पत्नी **सौ. जयश्री (वय ५७) यांचे दि.२७ मार्च २००७ रोजी** सांगली येथे निधन झाले. गेले काही दिवस त्या किडनी, मधुमेह इ. विकारांनी पीडित होत्या. त्यांच्या मागे पति, कन्या भारती, पुत्र प्रसाद सून व नातवंडे असा परिवार आहे.

**३.** विलेपार्ले येथील सभासद **श्री. रामचंद्र श्रीपाद मराठे (पृ.३१७) वय ९२ यांचे दि. ६ जून २००६ रोजी** निधन झाले. त्यांच्या मागे पुत्र मोहन व कन्या माया उकिडवे व परिवार आहे.

**४.** शीव येथील ज्येष्ठ सभासद श्री.अनंत धोंडो खांबेटे (पृ. ६९८) यांची ज्येष्ठ भगिनी **श्रीम. सुशीला प्र. अंकलीकर (वय ९१) यांचे दि. १७ मार्च २००७** रोजी शीव येथे निधन झाले त्यांच्या मागे कन्या पुत्र व नातवंडे असा परिवार आहे.

**५.** खुडिपाट येथील सदस्य **मनोहर (मंगेश) रामचंद्र मराठे (पृ.११५) वय ६७ यांचे १८ डिसेंबर २००६ रोजी** निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी , बंधू व कन्या व पुत्र असा परिवार आहे.


वरील सर्व दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दुःखात प्रतिष्ठान सहभागी आहे.

-०-

अक्षरगणेश ४: सिद्धेश्वर



# हे चिते!



-विनायक केशव मराठे (पृ.२०)वरळी, मुंबई ४०००२५
दूरध्वनी-२४३०३३२९

हे चिते!

काय दैदिप्यमान तेज आहे तुझे! कैलास पर्वताचा जणू तिसरा अक्षच. तुझ्या या अलौकिक तेजापुढे त्र्यैलोक्यातल्या साऱ्या शक्ती शरमून जातात. नटराजाच्या तांडवनृत्यानी सुद्धा जेवढा त्र्यैलोक्याचा थरकांप झाला नसेल, तेवढा तुझ्या केवळ दर्शनाने होतो.

तू संहारक आहेस. तुझ्या संहारक शक्तीपुढे थोरामोठ्यांचा निभाव लागत नाही. राजे, रजवाडे, विद्वान, पांढरपेशे, कारकून, दारिद्र्याने पोखरून निघालेले जीव, असे सारेच अगदी मुकाट्याने तुझ्यात विलीन होतात, नामशेष होतात.

तुझ्या दाहक मांडीवर असलेले जीव हिमतुल्य थंड असावेत हा चमत्कार नव्हे का? कदाचित तुझा अतितप्त विंझणाचा वारा सहन होणार नाही म्हणून भगवंतानी त्यांना चिरनिद्रा देऊन ठेवली असावी. तुझ्या मांडीवरील बालके आता उठणारच नाहीत. कारण उठण्यासाठी ती झोपी गेलेली नाहीत. मग तप्त मांडीवर घेऊन अतितप्त विंझणारा वारा घालण्याचा तुझा हा असुरी हट्ट कशाला? कदाचित् जगाला कंटाळून, थकून व भुकेने व्याकूळ होऊन ही बालके चिरनिद्रेच्या आहारी गेली असावीत. कदाचित पित्याने लाथाडल्यामुळे अपमानित होऊन अढळपद मिळविणाऱ्या ध्रुवबाळाप्रमाणे ती तुझ्या साम्राज्यात आली असावीत. कदाचित आई, वडील, बहीण, भाऊ, मुलेबाळे, सगेसोयरे या सगळ्याना रडवत ती हट्टाने तुझ्याकडे धांव घेत असावीत. पण हा हट्ट वेडगळ नाही का? तुझ्या या तप्त साम्राज्यात कसली शांती आणि कसले समाधान?

छे! मला वाटतं या सर्वांचे कारण अगदी वेगळंच असावं. तू क्रोधिष्ठ असून स्वामिनी आहेस आणि ही निष्पाप बालकं म्हणजे तुझ्या संहारक शक्तीपुढे नतनम्र होऊन पृथ्वीने तुला प्रसन्न करण्यासाठी दिलेले हे बळी असावेत. आजच्या युगात तुला हुकूमशहाच म्हणावे लागेल. आणि तुझ्या सारख्या असुर स्वामिनीला कोण दंड करणार? म्हणून आमची पृथ्वी तुला भिते.

हे जनमर्दिनी, तू आपल्या सहस्त्र ज्वालांच्या तालावर खुशाल असुरनृत्य कर. तुझ्या पायातील नुपुरांच्या तालावर चाललेले हे हिंसक नृत्य थांबविणारा या त्रिलोकात कुणीहि नाही. आमच्या जगातील कायदे तुझ्या आसुडाच्या एका फटकाऱ्या सरशी शतशः खंडित होऊन तिझ्या पायाशी लोळण घेतील. तुझ्या आसुडाचे फटके खाण्यासाठी आमच्या कमरा अगोदरच वाकल्या आहेत.

छे! छे! माते भीतीच्या व अज्ञानाच्या धुक्यात हरविल्यामुळे मला तुझ्या अंतरंगाचे दर्शनच होत नव्हते. तुझ्या प्रखर तेजोवलयाचा भेद करून तुझ्या अंतरंगात शिरण्याचे बळ आता मला प्राप्त झाले आहे.

माते तुझ्या अंतरंगात एक वेगळीच सृष्टी आहे. आमच्या सृष्टीची रचना, तिचे नियम या बाबत कोणतेही साम्य आढळत नाही. तुझ्या सृष्टीत आपमतलबी केंव्हाच जळून जातात. दुष्टांच्या अहंकाराची, चिमूटभर राख होते. देशद्रोहाचे अवशेषही उरत नाहीत.

हे मंगलमाते, तुझी सृष्टी किती पवित्र आहे! असत्याला अमंगळाला तिथे थाराच नाही.अमरत्वाला पोहोचलेले अनेक पुण्यात्मे हे मानवी देहाशिवाय तशीच इच्छा झाल्यास मायावी मानवी देह धारण करून आनंदाने विहार करतात. आम्ही मर्त्य मानव जुनी पुराणी कागदपत्रे, भग्न प्राचीन मूर्ती, काना कोपऱ्यात पडलेले शिलालेख यांचा अथक प्रयत्नाने संग्रह करतो आणि केव्हाच घडून गेलेला इतिहास पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न करतो. पण तुझी सृष्टीच निराळी. इथे काल्पनिक काही नाही. सांकेतिकाचा संपूर्ण अभाव. सर्व काही स्पष्ट आणि सत्य.

तुझ्या मंगल सृष्टीत अंगावर केशरी वस्त्र परिधान करीत जोहार करून तुझ्या सृष्टीत आलेल्या या रजपूत महिला एवढ्या आनंदात येथे विहार करीत असतील ही कल्पनाही आम्हा मूढ लोकांना करवत नाही. परकीयाना भारतातून हुसकावून लावणारे पण स्वजनांच्या देशद्रोही कारवायांना बळी पडलेले हिंदू सम्राट व सैनिक मोठ्या दिमाखाने घोडदौड करीत आहेत. भाऊबंदकीच्या रक्ताने माखलेल्या तलवारी वेध घेऊ लागल्यावर बिचारा नारायण काकांच्या पायाशी लोळण घेऊ लागला. पण पेशवाईच्या स्वप्नात दंग झालेल्या काकांनी त्याला गारद्यांच्या ताब्यात दिला तेच नारायणराव पेशवे येथे निर्धास्तपणे भोजन करताहेत. कारण गारद्यांच्या तरवारीने पेशवाईच्या तुकडे तुकडे झालेल्या आतड्यातून साखरभात बाहेर पडण्याचे आता काहीच कारण नाही. पेशवाईच्या चितेभोवती ढळाढळा अश्रू गाळीत रेंगाळणारा शाहीर प्रभाकर आयुष्याच्या संध्याकाळी संकटाने घेरला गेला होता. त्याला तुझे मुक्तद्वार दिसले नाही का? सत्तावनच्या धुमश्चक्रीत स्वदेशप्रेमाची ध्वजा दिमाखात मिरवणारी झाशीची राणी

*(पुढील मजकूर पृ.२० वर)*

### *छापता छापता! अभिनंदन !! (१)*

## डोंबिवलीच्या मानसीला व्हायचय चार्टर्ड अकाऊंटंट!!!



राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या पराक्षेत **डोंबिवली** येथील स. वा. जोशी विद्यालयाची **मानसी माधव मराठे** या विद्यार्थिनीने ६५० पैकी ६१५ (९४.६१ टक्के) गुण मिळविले आहेत. डोंबिवली विभागात १ ला क्रमांक मिळविणाऱ्या मानसीने चार्टर्ड अकाऊंटंट होण्याची इच्छा असल्याचे सांगितले. गुणानुसार तिचे मुंबई विभागात ४ थे रँकिंग आहे.

नियमित अभ्यास, शिक्षकांचे व क्लासचे मार्गदर्शन, पराक्षेच्या दोन महिने आधी घेतलेली मेहनत यामुळे हे यश संपादन करू शकल्याचे मानसीने नमूद केले आहे. गिर्यारोहण व वाचनाची तिला आवड आहे. मानसीने डोंबिवलीतून पहिला क्रमांक पटकावून तिने संस्थेची यशस्वी परंपराही कायम राखली आहे.

मानसीचे वडील श्री माधव मधुकर मराठे (पृ.३१६) हे इंडियन बँकेत रायचूर येथे अधिकारी आहेत. मानसीची आई एका खाजगी फर्ममध्ये व्यवस्थापन कार्य करतात.

मानसीच्या या उज्ज्वल यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन व शुभेच्छा.

*(हा अंक छापावयास जात असताना अगदी शेवटच्या क्षणी वरील कौतुकवार्ता फोनवरून कळली. योगायोग लगेचच दुसरीही वार्ता ई-मेलने बोर्डाच्या मार्कशीट व स्कॅन करून पाठविलेल्या फोटोसह प्राप्त झाली. त्यामुळे त्यांना स्थान देण्याचे औचित्य साधता आले.परिवारातील सदस्यांनी आमच्याशी दूरध्वनी/ ई-मेलवरून संपर्क साधल्यास अन्य ठिकाणाहूनही अशाच प्रकारचे कौतुकास्पद यश मिळविणाऱ्या गुणवंतांचा यथोचित उल्लेख हितगुज मधून करता येईल. संबंधित विद्यार्थी-पालक मंडळींनी आमच्याशी सतत संपर्कात राहून मराठे प्रतिष्ठानच्या सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घ्यावा अशी विनंती आहे.-सी.गो. खांबेटे, सह संपादक.)*

### *छापता छापता! अभिनंदन !! (२)*

## वसईच्या नंदनला व्हायचय इंजिनियर किंवा डॉक्टर !



राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या पराक्षेत **वसई** येथील सेंट अँथनीज कॉन्वेंट हायस्कूलच्या **नंदन अमृत मराठे** या विद्यार्थ्याने ६५० पैकी ६१३ (९४.३१ टक्के ) गुण मिळविले आहेत. वसई विभागात १ ला क्रमांक मिळविणाऱ्या नंदनचे मुंबई विभागात ६वे रँकिंग आहे. त्याला सध्या मेडिकल किंवा इंजिनियरिंगचे पर्याय खुले ठेवावयाचे आहेत. नंदनच्या यशात शाळेच्या शिक्षकांचा वाटा मोठा आहे. तो क्लासला गेला नाही. त्यामुळे त्याला अभ्यास करायला आणि परीक्षा सरावाला पुरेसा वेळ मिळाला. फलश्रुती शिक्षण मंडळाच्या सराव परीक्षांचा त्याला चांगलाच उपयोग झाला

अभ्यासाबरोबरच तबलावादन, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला, फूटबॉल, आणि क्रिकेटमध्ये त्याला रस आहे. तो मँचेस्टर युनायटेड फूटबॉल क्लबचा सदस्य आहे.

नंदनचे वडील श्री अमृत भालचंद्र मराठे (पृ.५४) हे स्वत: बी टेक असून त्यांचा "ओपल एच व्ही ए सी इंजिनियर्स प्रा.लि. " या नावाने दादर येथे सेंट्रल अेयर कंडिशनिंग प्रोजेक्ट्सचा व्यवसाय आहे. विशेष म्हणजे अमृत यानी सुद्धा १९७७ च्या शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत १६वा क्रमांक मिळवला होता.नंदनच्या आईनेसुद्धा १९८१ मध्ये बारावीच्या गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले होते. त्या जी एस मेडिकल कॉलेजमधून एम.डी (स्त्री-रोग) झाल्या असून त्यांचे वसईला चैतन्य नर्सिंग होम आहे.

नंदनच्या या उज्ज्वल यशाबद्दल मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन व शुभेच्छा.

**(वळण - पृ. १६ वरून)** म्लान नव्हता, तो गुलाबाच्या फुलासारखा सुकोमल, टवटवीत होता. मंजुषाला स्वप्न पडत होते. स्वप्नात तिला निळ्या उमद्या घोड्यावर स्वार होणारा सुंदर राजपुत्र दिसला. मम्मीच्या तावडीतून तिची सुटका करणार होता. गोष्टीतल्याप्रमाणे तिची सुटका करणारा तिला सुंदर विश्वात घेऊन जाणारा. जिथे ती स्वतंत्र होती-तिला तिचे मत होते-अस्तित्व होते-तिच्या आवडीप्रमाणे ती जगणार होती- निर्भय असणार होती.

तो प्रियकर राजपुत्र तिला म्हणाला," हसरी, गोड, निष्पाप मंजू, मला तू फार आवडतेस . मम्मीच्या काटेरी स्वभावावर हे सुंदर फूल कस उमललं ? आता मी या फुलाला बहरायला देणार ...फुलायला देणार.. तुझे द:ख मी समजू शकतो" असे म्हणून त्या राजबिंड्या युवकाने तिचा नाजुक हात हातात घेतला आणि आपल्या थरथरत्या ओठांनी त्याचे चुंबन घेतले. मंजूला अलगदपणे उचलून घोड्यावर घेतले. घोडा दौडत चालला. सुखाच्या नंदनवनात गेला.

स्वप्नातून जागे झाल्यावर तिला खूपच उल्हसित वाटले. जणू काही ती मम्मीच्या जाचातून मुक्त होऊन स्वत:च्या इच्छेप्रमाणे वागण्यास मोकळी झाली होती. तिने तोंड धुतले, पावडर लावली. कुंकू लावले. तिचा आवडता फिकट गुलाबी रंगाचा त्यावर नाजूक नक्षी असलेला पंजाबी ड्रेस घातला. आरशात न्याहाळताना आपल्याच रूपावर ती मोहित झाली. खरच आपण किती सुंदर दिसतो एखाद्या राजकन्येप्रमाणे!

'मंजुषा!' मम्मीच्या कर्णकठोर हाकेने ती भामावर आली.

"काय ग मम्मी ?" तिने नाखुषीने विचारले.

मंजुषेकडे मम्मीने तिरस्काराने कटाक्ष टाकला. तिच्या कपाळावर आठ्या उमटल्या. मनगटावरील घड्याळाकडे बघत मम्मीने हुकूम सोडला

"पाच मिनिटात तयार हो. -परवा नवीन आणलेला ड्रेस- ग्रीन कलरचा तंग टॉप आणि बरमोडा पॅंट घाल आणि कपाळावरील कुंकवाचा 'डाग' पुसून टाक आणि लिपस्टिक लाव. आपल्याला फॅशन शोला जायचं आहे."

मम्मीच्या हुकुमानुसार मंजुषा तयार झाली आणि उदास चेहऱ्याने मम्मीचे बोट पकडून चालू लागली. मम्मीची ऑर्डर ऐकायची अंगवळणी पडलेली सवय वास्तवातही सुटली नाही.

-०-

**(हे चित्ते! पृ.१९ वरून)**

तुझ्या सृष्टीत तशीच घोडदौड करत आहे. सत्तावनची आणि बेचाळीसची मृत्युंजय सेना अजूनही संचलन करित आहे. छे! छे! कल्पनाशक्तीच कुंठित झाली आहे.

हे महामंगल माते ! अज्ञानाच्या ओघात मी तुला अपशब्द बोललो; क्षमस्व! माते, क्षमस्व!

-०-

## *विशेष शैक्षणिक वृत्त*

नाशिकच्या श्रीमती लीला दिगंबर मराठे (पृ. ३६३) यांनी त्यांचे पती कै. दिगंबर दत्तात्रेय मराठे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ मराठे परिवारातील १० वीच्या परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला दर वर्षी पारितोषिक देण्यासाठी रु. १०,००० ची देणगी पुणे शाखेकडे पाठविली आहे. वर्ष २००८ च्या १० वीच्या परीक्षेपासून या रकमेच्या व्याजातून हे **कै. दिगंबर दत्तात्रेय मराठे स्मृती इंग्रजी पारितोषिक** देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

या उदार देणगीसाठी मराठे प्रतिष्ठान श्रीमती लीलाताईंना मनापासून धन्यवाद देत आहे.

# चिंतामण बळवंत मराठे स्मृती हस्ताक्षर स्पर्धा-१९०७

पुण्यांतले कुलबांधव गजानन चिंतामण यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ कुलबांधवांसाठी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित केली होती.स्पर्धेचा निकाल मार्च २००७ च्या अंकांत प्रसिद्ध केला आहे. स्पर्धेतील पारितोषिकपात्र हस्ताक्षर कुलबांधवांना पाहता यावे, त्यामुळे त्यांनाहि चांगले लिहिण्याची स्फूर्ति मिळावी या हेतूने पारितोषिक विजेत्या प्रथम क्रमांकाच्या स्पर्धकाचे हस्ताक्षर प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. मोहन सदाशिव मराठे यांनी प्रायोजित केले असून ते येथे छापले आहे. -संपादिका

प्रथम पारितोषिक प्राप्त हस्ताक्षर-

श्री. सदानंद विष्णू उर्फ भाऊ मराठे,(पृ.५०७) दादर.

**काही तांत्रिक अडचणीमुळे श्री. भाऊसाहेब मराठे यांचे हस्ताक्षराचा नमुना तूर्त दाखविणे शक्य झाले नाही. मात्र लवकरच हे पान सुधारून हस्ताक्षर नमुन्यासह टाकण्यात येईल. तसेच अन्य दोन अंकांप्रमाणे हा अंकही आपल्या वेबसाईट वर टाकला जाईल. क्षमस्व.**

www.marathepratishthan.org वर **मुखपत्र** या सदरावर क्लिक करा व हवा असलेला अंक वाचा व आपल्या सूचना / अभिप्राय अवश्य कळवाव्या .(केवळ खुषीपत्रे किंवा साधे मुद्रणदोषदर्शन शक्यतो टाळावे .)

**आपला अंक पोष्टाने/ कुरियरने पाठविला आहे. न मिळाल्यास व हवा असल्यास संपूर्ण नांव, पत्ता, व फोन/ मोबाईल नंबर आणि ई-मेल सह त्वरित कळवावे.**

**सह- संपादक.**

श्री.सीताराम गो. खांबेटे, ए-१३, संपदा सोसायटी,
स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी-पूर्व, मुंबई ४०००६९
**ई-मेल** (1) sitaram_khambete@yahoo.com
(2) maratheparivar@yahoo.co.in
**दूरध्वनी: ०२२-२६८३६९९४;**

ॐ

**फक्त सभासदांकरिता**

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८(मुं.) दि.१२.१.८१

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

दूरध्वनी : २४३० २४५३; फॅक्स : ९१-२२-२४३७ ९८६३.

**e-mail : maratheparivar@yahoo.co.in**

## २५ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके

१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७

### वार्षिक सर्वसाधारण सभा:

***रविवार दि. २२-७-२००७ सायंकाळी ५.०० वा.***

**सभास्थान:**

**दामले योगवेंद्र सभागृह, मनमाला टँक रोड, लोकमान्यनगर हॉलजवळ, माटुंगा रोड (प.रे.), मुंबई ४०० ०१६**

### विश्वस्त मंडळ

| | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृपृ. |
|---|---|---|---|---|
| १. श्री.आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. श्री.अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| ३. डॉ.राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २५४२ १८९१ | ठाणे-प. | २९१ |
| ४. श्री.सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २४४५ ८६४६ | दादर-प.,मुंबई | १२९ |
| ५. श्रीम. सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४४ ३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

### कार्यकारी मंडळ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. श्री.आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. श्री.रमाकांत माधव विद्वांस | सभासद | २४३० ५२६० | माहीम, मुंबई. | ६२३ |
| ३. श्री.मोहन सदाशिव मराठे | सभासद | २६४६ ४३५१ | खारा-प, मुंबई. | ३६५ |
| ४. श्री.हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५० २४३ ३०३८ | नालासोपारा. | ०२१ |
| ५. श्री.प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई. | १२० |
| ६. श्री.विनायक केशव मराठे | कार्यवाह | २४३० ३३२९ | वरळी, मुंबई. | ०२० |
| ७. श्री.लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८ ०१०४ | मुलुंड-पूर्व,मुंबई | ५२० |
| ८. श्री.सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३ ६९९४ | अंधेरी-पूर्व,मुंबई. | ६७६ |
| ९. श्री.प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २५४७ ७५११ | ठाणे | ३७६ |
| १०.श्री. हेमंत महादेव मराठे | सभासद | २६१७ ७७५७ | विलेपार्ले-पू.मुंबई | ४७१ |
| ११.श्री.चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५ ५३९० | परळ,मुंबई. | २२२ |
| १२.सौ.अदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई. | ३९९ |
| १३.श्री.पुष्करराज वामन मराठे | सभासद | २८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू मुंबई. | ५०३ |
| १४.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई. | १२० |
| १५.श्री कौस्तुभ सुरेश मराठे | सभासद | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू. | ०८७ |
| १६.श्री.अरुण दत्तात्रय मराठे (पुणे) | सभासद | ९५२० २४४७ ३२८१ | पुणे. | ०६१ |
| १७.श्री.अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त-कायमनिमंत्रित | ९५२५१ २४७०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| १८.श्री.यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई. | ३९९ |
| १९.श्री.वामन गणेश मराठे | कायम निमंत्रित | २८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू मुंबई. | ५०३ |
| २०.श्री सुरेश मराठे | सभासद-कायम निमंत्रित | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू. | ०८७ |
| २१.सौ.नीलांबरी रमेश मराठे | कायम निमंत्रित | ९५२० २४४५ ६२७० | पुणे. | २८० |

### बँकर्स

सारस्वत बँक, प्रभादेवी,मुंबई

युको बँक, टिळक रोड, पुणे

### लेखा-परीक्षक

चंद्रकांत वामन मराठे, ठाणे. (सनदी लेखापाल.)

## मराठे प्रतिष्ठान

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मराठे प्रतिष्ठानची पंचविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा *रविवार दि. २२ जुलै २००७ रोजी सायंकाळी ५.०० वा. दामले योगकेंद्र सभागृह, लोकमान्यनगर सभागृहाजवळ, मनमाला टँक रोड, माटुंगा रोड, (प.रे.), मुंबई ४०००१६* येथे आयोजित केली आहे.

एखाद्या संस्थेची २५ वर्षे पूर्ण होणे म्हणजे कौतुकाची गोष्ट आहे. तरी आपण सर्वांनी ज्यास्तीत ज्यास्त संख्येने अगत्यपूर्वक उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील कामे:

१) दि.२९ ऑक्टोबर २००६ रोजी झालेल्या चोविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.

२) दि.३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या वर्षाचा प्रतिष्ठानचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च संमत करणे.

३) सन २००७-०८च्या हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.

४) सन २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षांच्या कालावधीसाठी मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची निवड करणे.

४) सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.

५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून

मोहन सदाशिव मराठे

कार्यवाह

दि.२९ मे २००७

**टीपा:**

१) गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वा. त्याच ठिकाणी भरेल.

२) वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत. काही खुलासा हवा असल्यास सभेच्या ७ दिवसाअगोदर समक्ष किंवा पत्राने /ई-मेलने विचारावा.

